MACCIA 100
GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

October - November 2023/ Issue No. 12

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चर

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

### संपादकीय समिती

- अध्यक्ष
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **अनिलकुमार लोढा**
  उपाध्यक्ष
  - **करुणाकर शेट्टी**
  - **रविंद्र माणगावे**
  - **नितिन बंग**
  - **श्रीकृष्ण परब**
  - **शुभांगी तिरोडकर**
  - **कांतीलाल चोपडा**
  - **तनसुख झांबड**
- सरकार्यवाह
  **सागर नागरे**
- संपादक
  **विनी दत्ता**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक, सचिन यादव**

- **उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालय**
  २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १.
  फोनः (०२५३)२५७७७०४
  ई-मेलः nsk@maccia.org.in
- **पुणे जिल्हा कार्यालय**
  युनिट नं. १०, तीर्थ बिझनेस सेंटर, MIDC भोसरी, पूणे-२६
- **जळगाव जिल्हा कार्यालय**
  २१-ए, श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव -१.
- **रत्नागिरी जिल्हा कार्यालय**
  जावकर प्लाझा, जयस्तंभ, रत्नागिरी.
- **पलूस संपर्क कार्यालय**
  निकम टॉवर्स, पलूस तासगांव रोड, पलूस.

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

# अंतरंग

१. मनोगत
२. इंडोनेशिया सरकार व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व्यापार, पर्यटन वृद्धीसाठी संयुक्त उपक्रम राबविणार : ललित गांधी
३. जाकार्ता-इंडोनेशिया येथील भारतीय दुतावासात विशेष बैठक संपन्न
४. व्यापाऱ्यांच्या वाटेतले काटे दूर करू : पणन मंत्री अब्दुल सत्तार
५. महाराष्ट्र चेंबरचा उत्तराखंड राज्यासोबत सामंजस्य करार
६. महाराष्ट्र चेंबर आणि व्हिएतनाम यांच्यात सामंजस्य करार स्वाक्षरीत
७. उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी महसूल विभागनिहाय बैठका घेऊ : विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे
८. महाराष्ट्र सरकार उद्योजक आणि व्यापाऱ्यांसोबत असून बैठकीतून सर्व प्रश्न मार्गी लागतील : उद्योगमंत्री उदय सामंत
९. मायटेक्स एक्स्पो, पूणे मध्ये कोट्यावधीची ऊलाढाल, लाखो नागरिकांनी दिली भेट
१०. डायमंडचे देशातील सर्वात मोठे क्लस्टर नवी मुंबईत - नाम. उदय सामंत
११. फर्निचर उद्योगाला सर्वोतोपरी सहकार्य करु : केंद्रीय मंत्री नारायण राणे
१२. उद्योगाला चालना देण्यासाठी अधिकाधिक उपक्रम हाती घ्यावेत : विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे
१३. महाराष्ट्र चेंबरचे 'मायटेक्स्पो, नाशिक प्रदर्शन' प्रशंसनीय - माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात
१४. महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लागतील : माजी आमदार पृथ्वीराज देशमुख



## संपादकीय..

ललित गांधी
**अध्यक्ष**

**तमाम भारतीयांचे जीवन तेजोमय करणाऱ्या दिपोत्सवाच्या व नव संवत्सराच्या भरभरून शुभेच्छा !**

भारताच्या औद्योगिक व आर्थिक विकासाचा भक्कम पाया रचणाऱ्या उद्योजकांपैकी प्रमुख व दृष्टे उद्योजक, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संस्थापक शेठ वालचंद हिराचदं यांनी प्रशस्त केलेल्या मार्गावरून वाटचाल करताना 'महाराष्ट्र चेंबर' महाराष्ट्राच्या व पर्यायाने देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अविरतपणे वाटचाल करीत आहे. त्यांच्या १४१ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !

व्यापार, उद्योग क्षेत्राचा विकास व व्यवसाय सुलभता यासाठी चेंबर विविध स्तरावरून कार्यरत आहे.

महाराष्ट्रातील बाजार समितीशी निगडीत हजारो व्यापाऱ्यांना कालबाह्य बाजार समिती कायद्यामुळे भेडसावणाऱ्या अडचणी, फुड सेफ्टी कायद्यातील काही अव्यवहार्य तरतुदी, जीएसटी मधील क्लीष्टता या प्रमुख मुद्यांवर विचारमंथन करून व्यापाऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्यातील व्यापाऱ्यांसाठी काम करणाऱ्या फाम, ग्रोमा, कॅमिट व पूणे चेंबर या प्रमुख संस्थांना एकत्रित करून महाराष्ट्र चेंबर च्या पुढाकाराने पुण्यात आयोजित 'राज्यस्तरीय व्यापार परिषद' व्यापाऱ्यांच्या प्रचंड उपस्थितीत यशस्वीपणे संपन्न झाली.

नवीन व्यापार-उद्योगाच्या संधी, निर्यातीसाठी नवनवीन बाजारपेठांशी समन्वय या चेंबरच्या प्रमुख उपक्रमांतर्गत इंडोनेशिया सरकारच्या विशेष निमंत्रणावरून महाराष्ट्र चेंबरच्या २१ उद्योजकांच्या प्रभावी शिष्टमंडळाचे एक आठवड्याच्या इंडोनेशिया दौऱ्यासाठी नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली याचा मला विशेष आनंद आहे.

आतापर्यंतच्या अनेक परदेश दौऱ्यापेक्षा हा दौरा अतिशय वेगळा, महत्वपूर्ण व कमालीचा यशस्वी ठरला यामुळे हा आनंद द्विगुणीत झाला.

जाकार्ता अंतरराष्ट्रीय विमानतळावर 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' च्या शिष्टमंडळाच्या स्वागतासाठी कॉन्सुलेट जनरल यांनी स्वतः उपस्थित राहणे हा आम्हाला बसलेला पहिला सुखद धक्का होता.

इंडोनेशियाच्या केंद्रीय उद्योग मंत्रालयामध्ये संपन्न झालेल्या संयुक्त बैठकीत इंडोनेशियाच्या उद्योग खात्यांच्या ६ सर्वोच्च अधिकाऱ्यांबरोबर ४० वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती इंडोनेशिया साकारने 'महाराष्ट्र चेंबर' च्या शिष्टमंडळाचे दिलेले महत्व अधोरेखित करणारी होती.

इंडोनेशिया सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या बैठकीत उपमंत्री व सोळा वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती या दोन्ही बैठकात चेंबरच्या अध्यक्षांचा इंडोनेशिया सरकारने केलेला विशेष सन्मान या सर्व गोष्टी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्व अधोरेखित करणाऱ्या होत्या.

या दौऱ्यातील उल्लेखनीय बैठक झाली भारतीय दुतावासाच्या प्रशस्त कार्यालयात. विशेष म्हणजे 'महाराष्ट्र चेंबर' च्या शिष्टमंडळाच्या सन्मानार्थ भारत सरकारतर्फे विशेष सांस्कृतिक कार्यक्रम व मेजवानी चे आयोजन करण्यात आले होते. जाकार्ताच्या महाराष्ट्र मंडळाच्या भगीनींनी सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम व अस्सल महाराष्ट्रीयन जेवणाचे आयोजन जाकार्ता मध्ये करून शिष्टमंडळाचे सर्वोत्तम आदरातिथ्य केले.

भारताचे इंडोनेशियातील राजदुत संदीप चक्रवर्ती यांनी जाकार्ता दुतावासात महाराष्ट्र चेंबरला कायमस्वरूपी जागा देण्याची केलेली घोषणा हा या दौऱ्याचा सुवर्णकलश म्हणावा लागेल.

येणाऱ्या फेब्रुवारी २०२४ मध्ये 'दुबई' मध्ये होणाऱ्या महाबीज-२४ या GMBF व महाराष्ट्र चेंबरच्या संयुक्त आयोजनामुळे असाच एक अनुभव पुन्हा एकदा घेण्याची संधी सर्वांना मिळणार आहे. या दौऱ्यात जास्तीत जास्त सभासदांनी सहभागी व्हावे या अपेक्षेसह, धन्यवाद !

# इंडोनेशिया सरकार व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व्यापार, पर्यटन वृद्धीसाठी संयुक्त उपक्रम राबविणार : ललित गांधी

## इंडोनेशिया सरकारतर्फे ललित गांधी यांचा विशेष सन्मान

**'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चर' ही व्यापार, उद्योगातील सर्वात मोठी शिखर संस्था आहे. संस्थेच्या वतीने उद्योजक, व्यापारी बंधूना नवनवीन संधीची माहिती अवगत व्हावी. व्यवसाय, उद्योगवृद्धीसाठी नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमांतून मार्गदर्शन केले जाते. महाराष्ट्र चेंबरच्या सदस्यांसाठी दरवर्षी परदेशातील उद्योग, व्यापाराच्या नवीन संधी पाहण्यासाठी विशेष उपक्रम आयोजित केला जात आहे. १५ ते १९ ऑक्टोबरला महाराष्ट्र चेंबरचे २१ उद्योजकांच्या शिष्टमंडळाने नुकताच इंडोनेशियाचा अभ्यास दौरा केला. त्यातून भारत-इंडोनेशिया व्यापार, उद्योगवाढीसाठी महत्वपूर्ण पाऊल टाकण्यात महाराष्ट्र चेंबरला दैदिप्यमान यश मिळाले.**



**जकार्ता-इंडोनेशिया दौऱ्याप्रसंगी इंडोनेशिया सरकार चे उद्‌योग मंत्रालयातील सर्वोच्च अधिकारी व महाराष्ट्र चेंबर च्या शिष्टमंडळाची बैठक यशस्वीपणे पार पडली.**

**मुंबई :** इंडोनेशिया सरकार आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व्यापार, पर्यटन वृद्धीसाठी संयुक्त उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच महाराष्ट्र चेंबरला महाराष्ट्रातील उत्पादन विक्रीसाठी इंडोनेशिया सरकारने जागा दिली असून १३ लोकांना व्यापार करण्याची ऑर्डर तत्काळ मिळाली आहे. महाराष्ट्र चेंबरचे लवकरच जकार्ता येथे कार्यालय स्थापन होत असल्याची माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. इंडोनेशिया सरकारच्या आमंत्रणावरुन आणि भारत सरकारच्या सहकार्याने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे २१ उद्योजकांचे शिष्टमंडळाने जकार्ता-इंडोनेशिया हा दौरा १५ ते १९ ऑक्टोबरच्या या दरम्यान यशस्वीपणे पार पडला. हा दौरा निश्चितच उद्योजकांसाठी फलदायी झाल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरच्या शिष्टमंडळाने इंडोनेशियाचा दौरा केला. या शिष्टमंडळाचे जकार्ता आंतरराष्ट्रीय विमानतळावर इंडोनेशियाचे भारतातील महावाणिज्यदूत जनरल एड्डी वर्दोयो यांनी स्वागत केले. इंडोनेशिया सरकारतर्फे महावाणिज्यदूतांनी केलेला विशेष सन्मान पाहून महाराष्ट्र चेंबरचे शिष्टमंडळ भारावून गेले.

शिष्टमंडळात उद्योगपती एस. डी. परब, रमाकांत मालू, भरत येवला, सतीश लोणीकर, श्रीकांत पडोळ, संदीप नागोरी, नितीन इंगळे, मिलींद सांघवीकर, प्रमोद सांगोडे, भरत वखारिया, अर्जुन गायके, जयेश गायके, सुशीलकुमार सिंग, तरंजीतसिंग बग्गा, राधिका परब, अनिल परब, मिलींद बर्वे, मनोज झंवर, नंदकुमार शहा, चेंबरचे चीफ एक्झिकेटिव्ह ऑफिसर नितीन भट आदींचा समावेश होता.

या दौऱ्यात महाराष्ट्रात नवीन तंत्रज्ञान व भांडवली गुंतवणूक, महाराष्ट्रातून निर्यात वृद्धीसाठी नवीन क्षेत्रांची निवड या प्रमुख उद्देशाने इंडोनेशिया येथे विविध बैठकीचे आयोजन इंडोनेशिया आणि भारत सरकारने केले. या दौऱ्यात शिष्टमंडळाने 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' या संकल्पनेचे सादरीकरण केले. बिझनेस ग्रुपसोबत 'बी टू बी मिटींग', इंडोनेशियाच्या काऊन्सुलेट कार्यालयासोबत बैठक, महाराष्ट्र चेंबर आणि इंडोनेशियामध्ये व्यवसाय, व्यापार



**जकार्ता-इंडोनेशिया दौऱ्याप्रसंगी व्यवसाय हवामान आणि गुंतवणूक मंत्र्यांचे खाजगी सचिव डॉडी रहाडी, देशांतर्गत औद्योगिक क्षमता बळकट करण्यासाठी मंत्र्यांचे खाजगी सचिव इग्नेशियस वॉर्सिटो, औद्योगिक खोलीकरण, प्रसार आणि इक्विटी मंत्री यांचे खाजगी सचिव अरुस गुणवान यांचा सत्कार करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत इंडोनेशियाचे भारतातील महावाणिज्यदूत जनरल एड्डी वर्दोया**

वृद्धीसाठी महत्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात आली.

१५ ऑक्टोबर, २०२३ रोजी इंडोनेशियातील राष्ट्रीय स्मारक मोनास, तामन मिनी इंडोनेशिया इंदाह, अँकोल आर्ट मार्केट, उद्यानाला भेट दिली. १६ ऑक्टोबर रोजी इंडोनेशियाचे उद्योग मंत्रालयाचे देशांतर्गत औद्योगिक क्षमता बळकट करण्यासाठी मंत्र्यांचे खाजगी सचिव इग्नेशियस वॉर्सिटो, औद्योगिक खोलीकरण, प्रसार आणि इक्विटी मंत्री यांचे खाजगी सचिव अरुस गुणवान यांच्यासोबत दोन्ही देशातील व्यापार, उद्योग वाढीबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर कॉफी फॅक्टरीला भेट देण्यात आली. तेथील फॅक्टरीमधील नव्या तंत्रज्ञानाची, मार्केटिंगची माहिती शिष्टमंडळाने घेतली. १७ ऑक्टोबर रोजी जकार्ता येथील इंडियन दूतावास सोबत बैठक करण्यात आली. इंडोनेशियाचे पर्यटन मंत्रालय विभागाचे पर्यटन आणि सर्जनशील अर्थव्यवस्था मंत्रालयाच्या उपमंत्री (Ministry of Tourism and Creative Economy: Ms Ni Made yu Marthini, Deputy for Marketing) च्या नी मादे आयु मार्थिनी यांच्यासह अन्य मंत्र्यांसोबत ही बैठक झाली. दोन्ही देशातील पर्यटनच्या वाढीसाठी चर्चा करण्यात आली. KDIN DKI जकार्ता, इंडोनेशिया चेंबर ऑफ कॉमर्स आणि महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळा सोबत बैठक झाली. त्यानंत जकार्ता येथील भारतीय दूतावासासोबत बैठक झाली. या बैठकीनंतर सांस्कृतिक कार्यक्रम झाला. १८ ऑक्टोबर रोजी ICE-BSD सिटी – टांगेरंग, इंडोनेशिया येथे '३८ व्या ट्रेड एक्सपो इंडोनेशिया २०२३' च्या उद्घाटन समारंभासाठी महाराष्ट्र चेंबरचे शिष्टमंडळ उपस्थित राहिले. त्यानंतर इंडोनेशियन कंपनीसोबत B2B बैठक झाली. शिष्टमंडळाने ट्रेड फेअरला भेट देऊन नवीन माहिती घेतली.

१९ ऑक्टोबर रोजी चेंबर ऑफ कॉमर्स KDIN भारतीय समितीसोबत बैठक झाली. यामध्ये चेंबर ऑफ कॉमर्सचे फकीरचंद यांनी बैठकीत मार्गदर्शन केले. त्यांनी इंडोनेशियामध्ये व्यापार,



**इंडोनेशिया उद्योग मंत्रालयातील बैठकीनंतर उद्योग खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत महाराष्ट्र चेंबरचे शिष्टमंडळ.**







**जकार्ता-इंडोनेशिया दौऱ्याप्रसंगी इंडोनेशियाचे पर्यटन मंत्रालय विभागाचे पर्यटन आणि सर्जनशील अर्थव्यवस्था मंत्रालयाच्या उपमंत्री** (Ministry of Tourism and Creative Economy: Ms Ni Made yu Marthini, Deputy for Marketing) **च्या नी मादे आयु मार्थिनी यांच्यासोबत बैठक संपन्न झाली. दुसऱ्या फोटोमध्ये यांचा सत्कार करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत इंडोनेशियाचे भारतातील महावाणिज्यदूत जनरल एड्डी वर्दोया.**






**जकार्ता चेंबर ऑफ कॉमर्स च्या मुख्यालयात संपन्न बैठकीप्रसंगी जकार्ता चेंबर च्या उपाध्यक्षा मेलानी सुहार्ली महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व कॉन्सुलेट जनरल एड्डी वर्दोया.**

उद्योग वाढीसाठी काय करता येईल. तेथील प्राथमिक सुविधा, कागदपत्रे, गुंतवणूक कशा पद्धतीने करता येईल. गुंतवणूकीचे टप्पे कसे असतील. दोन्ही देशातील व्यापार, उद्योगांतील घटकांना होणारा लाभ आदीची माहिती दिली. त्यानंतर शिष्टमंडळ भारताकडे रवाना झाले.

दरम्यान महावाणिज्यदूत जनरल एड्डी वर्दोयो यांनी भारत व इंडोनेशिया यांचे वाणिज्य, पर्यटन व सांस्कृतिक संबंध अतिशय चांगले असून उभय देशांमधील व्यापार व पर्यटन वाढीबरोबरच सांस्कृतिक संबंध वृध्दिंगत करण्यासाठी आपले कार्यालय प्रभावीपणे कार्य करेल, असे सांगितले. तसेच व्यापार व पर्यटनासंबंधी संयुक्त कार्यक्रमाच्या कार्यकक्षा निश्चितीसाठी 'महाराष्ट्र चेंबर'च्या पदाधिकाऱ्यांना इंडोनेशिया भेटीचे निमंत्रण दिल्याचे सांगितले.

**ललित गांधी, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स**

### उद्योग, व्यापाराची नवे दालन खुले

व्यावसायिकांना नवनवीन बाजारपेठा, पुरवठदार, भागीदार, उत्पादने, सेवा आदींच्या उत्तम आणि मुबलक प्रमाणात संधी प्रदान करते. प्रत्येक टप्प्यात वेगवेगळ्या उदयोग-व्यापार क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले होते. इंडोनेशियन उत्पादन क्षेत्राची व्याप्ती आणि कार्यक्षमतेची माहिती घेतली. उत्पादनाच्या उत्कृष्ट तसेच जागतिक दर्जाच्या पद्धतीबाबत खूप काही शिकता आले. इंडोनेशियन

***भारत-इंडोनेशिया दौरा हा उद्योग आणि व्यापारासाठी मोठा फलदायी झाला आहे. व्यापार, उद्योगाची नवे दालने महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून खुली झाली आहेत. दोन्ही देशातील व्यापार, उद्योग वाढीला लागणार आहेत, असा ठाम विश्वास या दौऱ्यातून सदस्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने २९ देशांबरोबर सामंजस्य करार करून देशांतर्गत किंवा विदेशात व्यापार करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे.***

लोकांचा व्यवस्थितपणा आणि शिस्तही आमच्या निदर्शनास आला. नवीन पुरवठादार, भागीदार आणि व्यवसाय संधी शोधण्यासाठी नवीन दरवाजे उघडले गेले. या अभ्यास दौऱ्याने आपल्यात काय बदल घडविणे अपेक्षित आहे. व्यवसाय क्षेत्रात चौफर प्रगती कशी साधता येऊ शकते. इंडोनेशियाचे अधिक अनुकूल व्यावसायिक वातावरण, त्याची मोठी देशातंर्गत बाजारपेठ आणि उद्योजकतेला त्यांचा भक्कम पाठिंबा पाहायला मिळाला.पायाभूत सुविधेत मोठे रस्ते, रेल्वेचे जाळे, विमानसेवा, मुबलक पाणी, स्वस्त वीज, कुशल कामगार, महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग अशा अनेक गोष्टी निदर्शनास आल्या. त्यामुळे तेथील आर्थिक परिस्थिती उंचावली असल्याचे पाहायला मिळाले.






**महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली २१ उद्योजकांच्या शिष्टमंडळाचे जकार्ता आंतरराष्ट्रीय विमानतळावर इंडोनेशियाचे महावाणिज्यदूत जनरल एड्डी वर्दोयो यांनी स्वागत केले. दुसऱ्या छायाचित्रात इंडोनेशिया मध्ये आयोजित 'ट्रेड एक्स्पो'ला महाराष्ट्र चेंबर च्या शिष्टमंडळाने भेट दिली.**

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स

१. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स उद्योजक सदस्यांसाठी वेगवेगळ्या देशातील औद्योगिक प्रदर्शनांना भेट देण्यासाठी दरवर्षी विशेष उपक्रमांचे आयोजन करते.

२. नवीन कार्यप्रणाली, यंत्रसामग्री, मशिनरी नवनवीन तंत्रज्ञान, उत्पादनांची माहिती मिळते. त्याचा उपयोग त्यांच्या सध्याच्या उद्योगाचा विकास करण्यासाठी होतो.

३. अधिक आणि नवनवीन व्यवसाय संधी मिळतात. निर्यातक्षम उत्पादने तयार करण्याची प्रेरणा मिळते. या उपक्रमातून अधिकाधिक सदस्य, उद्योजक निर्यात व्यवसायाचा लाभ मिळवू शकतात.

४. नवीन कल्पना, उद्योग विस्तारासाठी असलेली स्वप्ने साकार करण्यासाठी परदेशी अभ्यास दौरे उपयोगी असतात.

५. इंटरनॅशल ट्रेड फेअरच्या अनुषंगाने महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाने संभाव्य पुरवठादार, भागीदारांच्या सोबत संपर्क साधला. इंडोनेशिया उत्पादनांची गुणवत्ता आणि किफायतशीर किंमत यामुळे सर्व सदस्य प्रभावित झाले.

६. महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाने कॉफी तयार करणाऱ्या फॅक्टरीला भेट देऊन नवीन तंत्रज्ञानाची आणि व्यवसायवृद्धीची माहिती घेतली.

## भारत- इंडोनेशियामधील विशेष संयोजक
## उद्योग मंत्रालय

- व्यवसाय हवामान आणि गुंतवणूक मंत्र्यांचे खाजगी सचिव डॉडी रहाडी
- देशांतर्गत औद्योगिक क्षमता बळकट करण्यासाठी मंत्र्यांचे खाजगी सचिव इग्नेशियस वॉर्सिटो
- औद्योगिक खोलीकरण, प्रसार आणि इक्विटी मंत्री यांचे खाजगी सचिव अरुस गुणवान
- इंडस्ट्रियल रिसोर्स ऍक्सेस आणि इंटरनॅशनल प्रमोशनच्या संचालक इकेन रेटनोउलन
- डाउनस्ट्रीम केमिकल आणि फार्मास्युटिकल इंडस्ट्रीजचे संचालक सैफुल बाहरी
- वन आणि वृक्षारोपण उत्पादने उद्योग संचालक मेरिजंतीज पुंगुआन पिंटारिया
- मानव संसाधन उपकरणांच्या विकास, शिक्षण आणि प्रशिक्षण केंद्राच्या प्रमुख रेस्तु युनी विदायती
- पर्यटन आणि सर्जनशील अर्थव्यवस्था मंत्रालयाच्या उपमंत्री नी मादे आयु मार्थिनी





**इंडोनेशिया सरकारच्या पर्यटन व सर्जनशील अर्थव्यवस्था खात्याच्या उप मंत्री 'नी मादे आयु मार्टीनी' यांनी इंडोनेशिया सरकारतर्फे ललित गांधी यांचा विशेष बोधचिन्ह देऊन सन्मान केला.**

## महाराष्ट्र चेंबरचे पाऊल पडते पुढे....

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर (स्थापना १९२७) ही राज्याच्या व्यापार, उद्योग, व्यावसायिक व कृषीपूरक उद्योगांची शिखर संस्था म्हणून गेल्या ९५ वर्षापासून यशस्वीपणे कार्यरत आहे. राज्यातील ८५० हून अधिक व्यापारी व औद्योगिक संघटना चेंबरशी संलग्न असून, शिखर संस्था म्हणून राज्यातील सात लाखांहून अधिक उद्योग व ३० लाखांहून अधिक व्यापारी आस्थापनांचे महाराष्ट्र चेंबर नेतृत्व करते.

### महाराष्ट्र चेंबरची उद्दीष्टे

व्यापारी, सर्व उद्योजक, कृषि उद्योजक यांच्या विकासासाठी अपेक्षित मागण्या, समस्या समजावून घेऊन शासकीय विभागाशी समन्वयाने सोडविल्या जातात. व्यापार, उद्योग, कृषी, उद्योग. सेवा उद्योगाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात. उद्योजकांना




**कादिन इंडोनेशिया - इंडिया कमिटी चे उपाध्यक्ष फकीर चंद यांचा सत्कार करताना चेंबरचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब, अध्यक्ष ललित गांधी व इतर मान्यवर**

प्रोत्साहन देण्यासाठी सेमिन्नास, बी २ बी मिटिंग्ज, प्रदर्शन भरविले जाते. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापार, उद्योग क्षेत्राशी समन्वय साधला जात आहे. या क्षेत्रातील संस्था संघटना, सरकारी विभागासोबत सामंजस्य आणि समन्वय साधला जातो.

### TEI २०२३ चे आयोजक

१. इंडोनेशियन व्यापार मंत्रालय

२. DEBINDO https://debindo.com

✻ कादिन जकार्ताचे जनरल हेड तात्याना एस. सुतारा

कादिन भारत-इंडोनेशिया

✻ भारतीय आयोगाचे उपाध्यक्ष आणि एशिया पॅसिफिक क्षेत्राचे उपाध्यक्ष फकीर चंद, भारतीय आयोगाच्या सदस्य आणि MSME समितीच्या अध्यक्षा (KDIN Indonesia) शर्मिला याह्या,

काऊन्सुल इकॉनॉमिक अफेअर्सचे तोल्हा उबैदी

✻ जकार्ता, इंडोनेशिया येथील भारतीय दूतावासचे राजदूत संदीप चक्रवर्ती




**भारतीय आयोगाच्या सदस्य आणि MSME समितीच्या अध्यक्षा (KADIN Indonesia) शर्मिला याह्या यांचा सन्मान करताना ललित गांधी सोबत कादिन इंडोनेशिया - इंडिया कमिटी चे उपाध्यक्ष फकीर चंद व मान्यवर.**




**भारतीय आयोगाच्या सदस्य आणि MSME समितीच्या अध्यक्षा (KDIN Indonesia) शर्मिला याह्या यांना मायटेक्स, मुंबईचे आमंत्रण देताना ललित गांधी**




# जाकार्ता-इंडोनेशिया येथील भारतीय दुतावासात विशेष बैठक संपन्न

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ला उत्पादन प्रदर्शनासाठी दुतावासात जागा देऊ - संदिप चक्रवर्ती, भारतीय राजदुत, जाकार्ता

इंडोनेशिया मध्ये महाराष्ट्रातील उत्पादनांची विक्री वाढविण्यासाठी जाकार्ता येथील दुतावासात 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ला उत्पादन प्रदर्शनासाठी कायमस्वरूपी स्वतंत्र जागा देण्यात येईल अशी घोषणा भारताचे इंडोनेशियातील राजदुत संदीप चक्रवर्ती यांनी केली व उपस्थित सर्वांनीच त्यांच्या या घोषणेचे जोरदार टाळ्या वाजवुन स्वागत केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या शिष्टमंडळाच्या सन्मानार्थ जाकार्ता येथील दुतावासात भारत सरकारतर्फे सांस्कृतिक संध्या व मेजवाणीचे आयोजन केले होते. तसेच इंडोनेशियातील भारतीय कंपन्या व चेंबरचे शिष्टमंडळ यांची बी२बी बैठक आयोजित केली होती त्याप्रसंगी ते बोलत होते.

सदर बैठकीसाठी जाकार्ता मधील प्रमुख भारतीय कंपन्यांचे पदाधिकारी मोठ्या संस्थेने उपस्थित होते. महाराष्ट्र मंडळ, जाकार्ता च्या भगिनींनी सांस्कृतिक मेजवानी बरोबर अस्सल महाराष्ट्रीयन जेवणाने पाहुणचार करून चेंबरच्या शिष्टमंडळास भारावुन टाकले.

महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी चेंबरची माहिती देऊन शिष्टमंडळाच्या दौऱ्याचा आदेश सांगितला व इंडोनेशियामध्ये मिळालेल्या प्रतिसादाबद्दल धन्यवाद व्यक्त केले. सदर बैठकीच्या यशस्वीतेसाठी भारतीय दुतावासातील अधिकारी श्रीमती मालविका प्रियदर्शनी, महाराष्ट्र मंडळाच्या अर्पिता पाटणकर, शैलेश हळबे, अमृता जोगळेकर, प्रज्ञा सांभुस, गीता हट्टंगडी, आरती ओंकार, शैला राठोड, स्नेहल अश्विन, सुजाता चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.




**जाकार्ता येथील भारतीय दुतावासात राजदुत संदिप चक्रवर्ती यांना मायटेक्स,मुंबई चे आमंत्रण देताना ललित गांधी**




जाकार्ता येथील भारतीय दुतावासात राजदुत संदिप चक्रवर्ती व ललित गांधी यांच्या समवेत महाराष्ट्र चेंबरचे शिष्टमंडळातील सदस्य

# व्यापाऱ्यांच्या वाटेतले काटे दूर करू

## मुंबईत संयुक्त बैठक घेणार - पणन मंत्री अब्दुल सत्तार यांची ग्वाही

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या पुढाकाराने फाम, ग्रोमा, कॅमिट व पूणे चेंबर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र राज्य व्यापारी परिषदेला प्रचंड प्रतिसाद**






**महाराष्ट्र राज्य व्यापारी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार,सुनील सिंघी ,ललित गांधी, राजेंद्र बाठिया, जितेंद्र शहा व अन्य मान्यवर दुसऱ्या छायाचित्रात पणनमंत्री अब्दुल सत्तार यांचा पुणेरी पगडी देऊन सत्कार करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, दि पूना मर्चेंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया.**

**पुणे :** जगात भारत देशाचा जो नावलौकिक आहे तो व्यापाऱ्यांमुळे आहे. देशाच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. व्यापाऱ्यांची शक्ती किती आहे याची मला जाणीव आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे हितरक्षण करण्यासाठी, त्यांच्या विविध मागण्यांबाबत येत्या १५ दिवसात मुंबईत व्यापक बैठक घेतली जाईल. व्यापारी बांधव ज्या मार्गावरून चालत आहेत, त्यांच्या वाटेतले काटे नक्की दूर करु, असे ठोस आश्वासन राज्याचे पणन आणि अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या पुढाकाराने फाम, ग्रोमा, कॅमिट, पूणे चेंबर आणि महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय राज्यव्यापी व्यापारी परिषदेचे आयोजन पुण्यातील श्री गणेश कला क्रीडा मंच येथे करण्यात आले होते. त्यावेळी पणन मंत्री अब्दुल सत्तार बोलत होते. या परिषदेसाठी सुमारे २५०० पेक्षा अधिक व्यापारी, संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्डचे अध्यक्ष सुनील सिंघी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे (मुंबई) अध्यक्ष जितेंद्र शहा, चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अँड ट्रेडचे (मुंबई) चेअरमन मोहन गुरनानी, अध्यक्ष दिपेन अग्रवाल, द ग्रेन, राइस अँड ऑइल सीड्स मर्चंट्स असोसिएशनचे (मुंबई) अध्यक्ष शरदभाई मारू, राज्य व्यापारी कृती समितीचे समन्वयक आणि दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे उपाध्यक्ष सूर्यकांत पाठक, भारतीय उद्योग व्यापार मंडळाचे अध्यक्ष बाबुलाल गुप्ता, माजी आ. मोहन जोशी आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह देऊन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी आणि राज्य व्यापारी कृती समितीचे समन्वयक आणि दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया यांच्या हस्ते मंत्री अब्दुल सत्तार यांचा सन्मान करण्यात आला.

मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले, अर्थव्यवस्थेत व्यापारी बांधवांचे मोठे योगदान आहे. तसेच शेतकरी हितासाठीदेखील व्यापारी हा घटक महत्त्वाचा आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांना न्याय देण्याची आमची भूमिका आहे. आजच्या राज्यव्यापी व्यापारी अधिवशेनच्या निमित्ताने त्यांचे प्रश्न मी ऐकले आहेत. ते मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवण्याची मी हमी देतो, असेही ते म्हणाले.

व्यापारी हिताच्या सर्व प्रश्नांवर येत्या मुंबईत संयुक्त बैठक घेऊ, त्यात सर्व संबंधित खात्यांचे सचिव आणि अधिकारी उपस्थित राहतील, असे नमूद करताना पणन संचालकांनी या बैठकीची तयारी सुरू करावी, असे निर्देशही सत्तार यांनी दिले.

या बैठकीतनंतर पुढच्या पंधरा दिवसांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासमवेत बैठक आयोजित करून, व्यापाऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढला जाईल. डिसेंबरमध्ये विधिमंडळाचे अधिवेशना आहे. सेस रद्द करण्यासह बाजार समिती नियम आणि अटींमध्ये काय प्रस्तावित बदल करायचे आहेत, ते विधिमंडळातही मांडले जातील, अशी ग्वाही मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली. महाराष्ट्र राज्य व्यापारी परिषदेसाठी राज्यभरातून व्यापारी मोठ्या संख्येने

आले आहेत. व्यापाऱ्यांमध्ये पहिल्यांदाच एवढी एकजूट पाहिली, असे कौतुकही त्यांनी यावेळी केले.

राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्डचे अध्यक्ष सुनील सिंघी म्हणाले, व्यापाऱ्यांच्या हितासाठी राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्ड स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच स्थापन झाले आहे. आता व्यापाऱ्यांना त्यांच्या समस्या सोडविण्यसाठी रस्त्यावर उतरण्याची गरज पडणार नाही. संघटनेच्या माध्यमातून आपण एकत्रितरित्या संवाद साधून समस्या सोडवू शकतो. व्यापाऱ्यांना वयाच्या साठीनंतर ३ हजार रुपये पेन्शन देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. तसेच सर्व प्रकारच्या परवान्यांसाठी एक खिडकी योजना राबवली जाणार आहे. व्यापाऱ्यांच्या स्वाभिमान आणि सन्मानाला ठेच लागणार नाही यासाठी आम्ही आहोत, असेही त्यांनी सांगितले.

राज्य व्यापारी कृती समितीचे समन्वयक आणि दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया यांनी प्रस्ताविकात व्यापाऱ्यांच्या विविध मागण्यांचा आढावा घेतला. ते म्हणाले, आज राज्यातील व्यापारी त्रस्त आहेत. त्यांच्या व्यवसायासमोर अनेक अडचणी आहेत. राज्यातील व्यापारांच्या व्यवसायाला उर्जितावस्था प्राप्त करुन देण्यासाठी दुहेरी कर आकारणी रद्द करणे आवश्यक आहे. परंपरागत व्यापार नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. मार्केट आवारातील ४० टक्के व्यापार कमी झाला आहे., परंपरांगत व्यापार टिकवायचा असेल, तर महाराष्ट्रातून बाजार समिती कर, अर्थात सेस हद्दपार होणे अनिवार्य आहे. सेस रद्द च्या मागणीला उपस्थित व्यापाऱ्यांमधून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, रस्त्यावर उतरल्याशिवाय व्यापारांचे प्रश्न सुटणार नाहीत. व्यापारांनी आपली एकी आणि ताकद दाखवायला हवी. व्यापारी करांच्या किचकट प्रक्रियेत अडकले आहेत. व्यापारी आणि सरकार यांच्या संवाद घडून यायला पाहिजे.

फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे (मुंबई) अध्यक्ष जितेंद्र शहा, चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज



राष्ट्रीय व्यापारी कल्याण बोर्डचे अध्यक्ष सुनील सिंघी यांचा पुणेरी पगडी देऊन सत्कार करण्यात आला.

अँड ट्रेडचे (मुंबई) चेअरमन मोहन गुरनानी, अध्यक्ष दिपेन अग्रवाल, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे उपाध्यक्ष सूर्यकांत पाठक, भारतीय उद्योग व्यापार मंडळाचे अध्यक्ष बाबुलाल गुप्ता यांनी यांनीही व्यपाऱ्यांचे प्रश्न मांडले.

बाजार समिती सेस रद्द व्हावा, एपीएमसीचे कालबाह्य कायदे दुरुस्त करावे, एफएसएसएआय कायद्याच्या आणि जीएसटीच्या जाचक अटी रद्द कराव्या आदी मागण्या यावेळी विविध व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केल्या.

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, संचालक प्रशांत शिंदे, राहुल नष्टे, संपत पाटील, सुरेश इंग्रोळे आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अँड ट्रेड (मुंबई), द ग्रेन, राइस अँड ऑइल सीड्स मर्चंट्स असोसिएशन (मुंबई) आणि दि पूना मर्चंट्स चेंबर या राज्यातील प्रमुख व्यापारी संघटना तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि पुणे व्यापारी महासंघाचाही परिषदेत सहभाग होता. चेंबरचे सचिव रायकुमार नहार यांनी सर्वांचे स्वागत केले. भूषण करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले. अजित बोरा व ईश्वर नहार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. दिनेश मेहता यांनी आभार मानले.



व्यापारी परिषदेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले व्यापारी बांधव.

dolphin GROUP

# 20+ Years Experience

2 MILLION + SQ FT DELIVERED

Some of our ongoing projects



**[MATRIX]**

Hinjewadi Phase -2

Showrooms & Offices

**Commercial**



**PALMS**

Ravet

2&3 BHK - Showrooms

**Residential**



**CASA GRANDE**

Ravet

2&3 BHK

**Residential**



**CAPITAL**

Telco Road

Industrial Showrooms

**Industrial**

We are open to taking all opportunities for **JV** (Joint Venutre), **Land Development,** and **Partnerships** in *Residential,* Industrial (including warehousing) and **Commercial** projects.

dolphin GROUP | **Corporate Office:** Plot no. 151, Sector 24, Pradhikaran, Nigdi, Pune- 411044. | +91 9527044344 +91 91460 52405 | office@dolphingroup.net.in sales@dolphingroup.net.in



**हॉटेल ताज येथे उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी समवेत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष तनसुख झांबड, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब सिडकूल मॅन्यु. असो. उत्तराखंडचे हरेंद्र गर्ग आदी मान्यवर.**

**महाराष्ट्र चेंबरचा उत्तराखंड राज्यासोबत सामंजस्य करार**

# ‘सुविधा आणि कौशल्य केंद्र’ स्थापन होणार : ललित गांधी

**मुंबई :** उत्तराखंडमधील डेहराडूनमध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरने सुविधा आणि कौशल्य केंद्र (Facilities and Skills Centre) स्थापन करावे. त्यासाठी आवश्यक ती जागा उपलब्ध करुन दिली जाईल, अशी ठोस ग्वाही उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरच्या शिष्टमंडळाला दिली.

उत्तराखंडच्या सरकारने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सला हॉटेल ताज येथील कार्यक्रमासाठी निमंत्रित केले होते. त्या वेळी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी उत्तराखंड येथे येण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळाने आमंत्रण दिले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी या आमंत्रणाचा स्वीकार करुन लवकरच उत्तराखंड येथे शिष्टमंडळ येईल, असे सांगितले. या वेळी महाराष्ट्र चेंबर आणि उत्तराखंड राज्यात Facilities and Skills Centre साठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या.

यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना १९२७ मध्ये झाली. महाराष्ट्र चेंबरी ही व्यापार, उद्योग क्षेत्रातील सर्वांत जुनी राज्यातील शिखर संस्था आहे. गेल्या शंभर वर्षात चेंबरने देशातील उद्योग, व्यापारासह राज्याच्या सर्वांगीण प्रगतीत महत्वाची भूमिका बजावित आहे. उत्तराखंडामध्ये व्यवसाय आणि पर्यटनाच्या खूप संधी आहेत. डेहराडून येथे सुविधा आणि कौशल्य केंद्र झाल्यास दोन्ही राज्यासाठी खूप फायदेशीर ठरणार आहे. प्रस्तावित केंद्र वन-स्टॉप डेस्टिनेश म्हणून काम करेल. उत्तराखंडमध्ये गुंतवणूक करणाऱ्या महाराष्ट्रातील उद्योजकांसाठी एक विशेष संधी उपलब्ध होईल. एकाच छताखाली सर्वच सुविधा उपलब्ध झाल्यास गुंतवणूक प्रक्रिया सोपी होईल.

शिष्टमंडळात महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष तनसुख झांबड, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब यांचा समावेश होता.

उत्तराखंडची राजधानी म्हणून डेहराडून असल्याने पर्यटकांसाठी ते एक महत्वाचे केंद्र ठरले. गुंतवणूकदार आणि व्यवसायासाठी नवी संधी ठरणार आहे. दोन्ही राज्याच्या प्रयत्नामुळे व्यापार आणि उद्योगाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन तरुणांच्या हाताला काम मिळेल. उत्तराखंडचे नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे विशेष प्रयत्न केले जातील. त्यासाठी नवा प्रकल्प असित्वात येण्यासाठी भूखंड मिळाल्यास पुढील प्रक्रिया सोपी होईल, असेही शिष्टमंडळाने उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांच्याकडे स्पष्ट केले. या वेळी मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतुक केले. तसेच महाराष्ट्र चेंबर आणि उत्तराखंड राज्यात सामंजस्य करार झाल्याचे जाहीर केले.





हॉटेल ताज महाल येथे उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांचा सत्कार करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्ष तनसुख झांबड, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब आदी मान्यवर.

## या केंद्रातून काय साध्य होईल

- गुंतवणुकीचे समर्थन: नियामक प्रक्रिया, परवानगी आणि मार्गदर्शन
- उत्तराखंडमध्ये व्यवसाय सुरू करण्यासाठी परवाना प्रक्रिया
- कौशल्य वाढविण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आणि कार्यशाळा
- स्थानिक कर्मचाऱ्यांचे, त्यांना उद्योगांच्या गरजांनुसार रोजगाराची उपलब्धता
- पर्यटन प्रोत्साहनासह देण्यासाठी दोन्ही राज्याकडून संयुक्त कार्यक्रम
- उद्योग, राज्याच्या पर्यटन क्षेत्राला चालना
- व्यवसायामधील परस्पर संवाद सुलभ होणार
- महाराष्ट्र आणि स्थानिक उद्योजक, सहकार्य आणि ज्ञानाला प्रोत्साहन देणारी देवाण घेवाण
- गुंतवणुकीचा सर्वसमावेशक डेटाबेस
- उत्तराखंडमधील संधी, बाजारातील अंतर्दृष्टी आणि सरकारी धोरणांची माहिती मिळणार.


गायके ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज



अर्जुन गायके
एम.डी.



सचिन गायके
संचालक

मे. स्वगती इंजिनिअरींग
एम.आय.डी.सी. चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

में. मधुरा डायकास्ट प्रा. लि.,
एम.आय.डी.सी. शेंद्रा, छत्रपती संभाजीनगर

जय इंटरप्राईजेस,
एम.आय.डी.सी. शेंद्रा, छत्रपती संभाजीनगर

गायके इंडस्ट्रीज,
एम.आय.डी.सी. चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गायके इंडस्ट्रीज,
युनीट-२, एम.आय.डी.सी. शेंद्रा, छत्रपती संभाजीनगर

लॅक्टम फॉर्मा प्रा.लि.,
एम.आय.डी.सी. शेंद्रा, छत्रपती संभाजीनगर

जी.जी.मार्केट,
एम.आय.डी.सी. शेंद्रा, छत्रपती संभाजीनगर



जयेश गायके
संचालक

मॅन्युफॅक्चरिंग : ऑटो कंम्पोनंटस् आणि ॲन्युमिनियम प्रेशर डाय कास्टींग


जळगाव जिल्ह्यात 40 वर्षांपासून ग्राहक सेवेत असलेले
ऑटोमोबाईल्स क्षेत्रातील नामवंत प्रतिष्ठान..
HF Deluxe
Passion +
DESTINI PRIME
NeoStar A211N
ALL ELECTRIC C-SUV
XUV400
सातपुडा ऑटोमोबाईल्स ▪ बच्छाव मोटर्स ▪ सातपुडा मोटर्स
एम.आय.डी.सी.चौक, अजिंठा रोड, जळगाव-425001. फोन : 0257-2272727 ते 31
अधिकृत विक्रेते
mahindra Rise
Hero
Kubota
ASHOK LEYLAND HEAVY VEHICLE
mahindra First Choice
India's no.1 Multibrand Certified Used Car Company
प्रा. डी. डी. बच्छाव ◆ किरण बच्छाव ◆ उज्ज्वल बच्छाव

# व्हिएतनाम-महाराष्ट्र व्यापार वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबरचा पुढाकार अभिनंदनीय - विन्ह लाँग प्रांताच्या उपमुख्यमंत्री नुयेन थी कुएन थान

## महाराष्ट्र चेंबर आणि व्हिएतनाम यांच्यात सामंजस्य करार स्वाक्षरीत



**व्हिएतनाम आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यात व्यापार वृद्धीसाठी सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी आणि यंग एंटरप्रायझेस असोसिएशन ऑफ विन्ह लाँग प्रोव्हीन्सचे उपाध्यक्ष ट्रॅन व्हॅन होआंग यांच्या हस्ते करारावर स्वाक्षरी झाल्या. या वेळी विन्ह लाँग प्रांताच्या उपमुख्यमंत्री नुयेन थी कुएन थान, राज्यपाल बुई व्हॅन न्हिएम, कॉन्सुलेट जनरल ली क्वांग बिएन, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब**

**मुंबई :** व्हिएतनाम-महाराष्ट्र व्यापार वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचा पुढाकार महत्वपूर्ण असून अभिनंदनीय असल्याचे प्रतिपादन विन्ह लाँग प्रांताच्या उपमुख्यमंत्री नुयेन थी कुएन थान यांनी केले. व्हिएतनाम-भारत व्यापार परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

व्हिएतनाम मधील विन्ह लाँग प्रातांचे राज्यपाल बुई व्हॅन न्हिएम यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न व्हिएतनाम-भारत व्यापार परिषदेच्या उद्घाटन समारंभास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी सन्मानीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील Radisson Blu च्या हवेली हॉलच्या ११ व्या मजल्यावर १६ नोव्हेंबर रोजी व्हिएतनाम-भारत व्यापार परिषद संपन्न झाली. व्हिएतनामचे मुंबईतील कॉन्सुलेट जनरल ली क्वांग बिएन, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब, काऊन्सिल सदस्य निलेश घरत, प्रमोद शहा, गौरी खेर, बिंदा कन्यालकर यांच्यासह चेंबरचे विविध सदस्य, व्यापार उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवर परिषदेला उपस्थित होते.

विन्ह लाँग प्रांताच्या उपमुख्यमंत्री नुयेन थी कुएन थान म्हणाल्या, भारत-व्हिएतनाम द्विपक्षीय व्यापारी संबंध हे केवळ व्यवहाराचे नाहीत; ते परस्पर विश्वास आणि आदराचे आहेत. व्यवसाय वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने घेतलला पुढाकार निश्चितच फलदायी ठरणार आहे. लवकरच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळाला व्हिएतनाम येथे आमंत्रित केले जाणार आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, महाराष्ट्र आणि व्हिएतनाम मध्ये व्यवसाय वृद्धीची मोठी संधी उपलब्ध होत आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. महाराष्ट्र चेंबर, आर्थिक वृद्धी आणि उद्योगाला चालना देण्यात अग्रेसर आहे. ९५ वर्षांहून अधिक काळचा वारसा, व्यवसाय, व्यापार आणि उद्योगाला चालना देण्यासाठी समर्पित असून महाराष्ट्रातील सहकार्य आणि संबंध मजबूत करण्यात आघाडीवर आहे. केवळ राज्यातच नाही तर जागतिक स्तरावरही चेंबरचे कार्य सुरु आहे. ही परिषद अर्थव्यवस्थेला आणि महाराष्ट्रासाठी विशेष महत्वाची ठरली आहे.

दरम्यान व्हिएतनामचे कॉन्सुल जनरल ली क्वांग बिएन यांचे स्वागतपर भाषण झाले. या वेळी विन्ह लाँग प्रांताचा परिचय करुन देणारी चित्रफीत दाखविण्यात आली. विन्ह लाँग प्रांतातील गुंतवणुकीचे वातावरण, प्रोत्साहन धोरणे आणि गुंतवणुकीसाठी आवाहन करणारे प्रमुख प्रकल्प यावर सादरीकरण झाले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' विषयावर सादरीकरण केले. दोन्ही देशात व्यापार, उद्योग, पर्यटन विकासासाठी विविध विषयावर सामंजस्य करार (MOU) झाला. यंग एंटरप्रायझेस असोसिएशन ऑफ विन्ह लाँग प्रोव्हीन्सचे उपाध्यक्ष ट्रॅन व्हॅन होआंग यांनी करारावर स्वाक्षरी केल्या. त्यानंतर बी टू बी मिटिंग झाली.

### प्रगतीचे प्रवेशद्वार

सहयोग आणि नाविन्यपूर्ण यांसारख्या परिषदांमधून उद्भवणारे उपाय यात महत्त्वाचे ठरतात. आर्थिक संबंधांच्या भविष्याला आकार मिळू शकतो. सहकार्याचे नवीन मार्ग, विशेषतः उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये अक्षय ऊर्जा, ई-कॉमर्स आणि डिजिटल तंत्रज्ञान आहे. व्यापारी संबंध मजबूत करुन नवीन क्षेत्राचा शोध आणि सहयोगी प्रयत्नामुळे परस्पर फायदे मिळू शकतात, असा सूर व्हिएतनाम-भारत व्यापार परिषदेतून उमटला.

MENON | Driven By Technology

MENON PISTONS

MPR
MENON PISTON RINGS

With Best Compliments



**Corporate Office:**

182, Shiroli, Kolhapur 416 122, Maharashtra, India.

+91 230 2468041 / 2468042  info@menonindia.in

www.menonindia.in

# उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी महसूल विभागनिहाय बैठका घेऊ : विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

## महाराष्ट्र चेंबरचे जकार्ता येथे लवकरच कार्यालय : अध्यक्ष ललित गांधी



**'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर' तर्फे आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपोचे (मायटेक्स) फीत कापून उद्घाटन करताना महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे. उपस्थितात महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, तनसुख झांबड, चेंबरचे विश्‍वस्त आशिष पेडणेकर, आनंद मित्तल, डॉ. गोविंद पानसरे, डॉ. विजयकुमार मालपुरे, सेक्रेटरी जनरल सागर नागरे आदी मान्यवर.**

**पुणे :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर ही संस्था उद्योग आणि कृषी क्षेत्रात उत्तम नेतृत्व करत असून उद्योजक, व्यापारी यांच्या विकासात संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी महसूल विभागनिहाय बैठकीचे आयोजन करून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली. दरम्यान आयात-निर्यातीचा टक्का वाढविण्यासाठी लवकरच महाराष्ट्र चेंबरचे जकार्ता येथे कार्यालय स्थापन होत असल्याची घोषणा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी या वेळी केली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरतर्फे आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपो (मायटेक्स) च्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी होते. शिवाजीनगर येथील ॲग्रीकल्चर कॉलेजच्या मैदानावर येत्या २९ ऑक्टोबर पर्यंत प्रदर्शन भरले आहे.

यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते 'मायटेक्स एक्स्पो' चे स्मृतिचिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन डॉ. नीलम गोऱ्हे यांचा सत्कार करण्यात आला. कृषी विद्यापीठाचे सहाय्यक अधिष्ठाता डॉ. सुनील माशाळकर, एसबीआयचे सहाय्यक महाव्यवस्थापक निरंजन कान्हेकर यांचा सत्कार झाला डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते भारत सरकारच्या जूट बोर्डाचे व्यवसायवृद्धी प्रमुख अय्यपान, एक्सपो इंडियाचे जावेद शेख ,भारत सरकारच्या टेक्स्टाईल विभागाचे वरिष्ठ संचालक शिक्षण चंद्रशेखर आदींचा सत्कार झाला. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, चेंबरचे विश्‍वस्त आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, तनसुख झांबड, आनंद मित्तल, डॉ. गोविंद पानसरे, डॉ. विजयकुमार मालपुरे, सेक्रेटरी जनरल सागर नागरे आदी उपस्थित होते.

यावेळी उपसभापती गोऱ्हे यांनी प्रदर्शनातील काही स्टॉल्सना भेटी देवून पाहणी केली. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर ही संस्था १९२७ पासून उद्योग आणि कृषी क्षेत्राचा




**'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर' तर्फे आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपोचे (मायटेक्स) च्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे व्यासपीठावर मान्यवर.**

समन्वय साधून शहरी तसेच ग्रामीण भागात उद्योगांचे चित्र बदलण्याचे काम करीत आहे. सन २०१५ पासून भारतात शाश्वत विकासाचे काम सूरू झाले असून शेतीतील अवजारे, दळणवळणाची साधणे, लॉजिस्टीक सेवा यांच्यासह अनेक उद्योग भरभराटीला आले आहेत. गेल्या १५ ते २० वर्षात समाजात परिवर्तन मोठ्या प्रमाणात होत आहे. या बदलामुळे अन्न उद्योग आणि आदरातिथ्य क्षेत्रात उद्योजकांना मोठ्या प्रमाणात संधी निर्माण झाली आहे.

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, परदेशात स्थायिक झालेले भारतातील विद्यार्थी भारताच्या मातीशी नाते ठेऊन भारतातील उद्योग वाढण्याच्या दृष्टिने काम करीत आहेत. परदेशात उद्योग वाढ करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने इंडोनेशिया देशातील जकार्ता येथे कार्यालय स्थापन केले आहे. अशाच प्रकारे इतर देशातही संस्थेने कार्य करावे. चेंबरने जगातील खंडानुसार इंटर्नल चॅप्टर तयार करावेत जेणेकरून परदेशात गेलेल्या उद्योजक, परदेशात गेलेले विद्यार्थी आणि आपले उद्दिष्ट यांचे सुसूत्रीकरण करता येईल. त्यानुसार शासनातर्फे परदेशाच्या दूतावासाशी संपर्क करून उद्योगांना चालना देण्याचे काम करता येईल, असेही त्या म्हणाल्या.

महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून औद्योगिक नवकल्पना आणि पायाभूत सुविधासाठी प्रयत्न करावेत. शिक्षण, आरोग्य, आर्थिक प्रगती या विषयावर अभ्यास करून त्या क्षेत्राला दिशा देणे आवश्यक





आहे. ग्राहकांचा कल ऑनलाईन खरेदीकडे जात असल्यामुळे किरकोळ व्यापारी अडचणीत येत आहेत. त्यासाठी ग्राहकांच्या गरजा बघून व्यापार करण्याची दिशा ठरवावी. सध्या सेवा



**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा सत्कार करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर उपस्थित रविंद्र माणगावे, करूणाकर शेट्टी आदी व्यासपीठावर मान्यवर.**

क्षेत्र खुप दुर्लक्षित आहे. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले तर चांगले मनुष्यबळ तयार होईल. उद्योजक, व्यापाऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी उद्योजकांनी हॉटेल उद्योग सूरू करावेत. सौर ऊर्जेचे प्रकल्प स्थापन करण्यासाठी उद्योजकांनी पुढाकार घ्यावा. उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी महसुल विभागनिहाय बैठकीचे आयोजन करून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, ग्वाही त्यांनी दिली.

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, सध्याच्या काळात कुटुंबाच्या गरजा बदलत चालल्या आहेत. ही वस्तुस्थिती पाहून व्यापारी बंधूंनी अपडेट आणि हायटेक होण्याची गरज आहे. उद्योग व्यवसाय याच्या वाढीसाठी सरकारतर्फे सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. स्पर्धात्मक युगात डिजिटल प्लॅटफॉर्म आला आहे ग्राहकही मोठा हुशार आणि चोखंदळ झाला आहे ग्राहकांच्या गरजा बदलत चालल्या असून उत्पादनाच्या किमती व दर्जा त्यांचे आयुष्य पाहून खरेदी केल्या जातात त्यामुळे उद्योजकांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे असा सल्लाही त्यांनी




**'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर' तर्फे आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपोचे (मायटेक्स) च्या उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर उपस्थित महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, तनसुख झांबड, चेंबरचे विश्वस्त आशिष पेडणेकर, आनंद मित्तल, डॉ. गोविंद पानसरे, डॉ. विजयकुमार मालपुरे, कुलगुरू डॉ.पी.जी.पाटील**

उद्योजकांना दिला.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरने उद्योगाचा पाया रचला आहे. अग्रणी उद्योजक वालचंद हिराचंद यांनी भारतातील औद्योगिकरणात मोठी क्रांती केली. राज्यातील नागरिकांनी उद्योगाकडे वळावे, यासाठी चेंबर कार्य करीत आहे. ऑनलाईन खरेदीत वाढ पाहता किरकोळ व्यापाराला सावरण्यासाठी अशा प्रकारचे प्रदर्शन वरदानच आहे. व्यापारी बंधूना इ-कॉमर्सचे ग्रहण, रिटेल व्यवस्था मोडीत काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. सरकारकडून परदेशी कंपन्यांना मोठ्या सवलती, मात्र भारतीय कंपन्या वंचित राहिल्या आहेत. भारतीय कंपन्यांना सवलती देण्याबरोबर नवीन ई-कॉमर्स धोरण निश्चितीसाठी केंद्र सरकारकडे शिफारस करावी.

चेंबरचे अध्यक्ष गांधी म्हणाले, सध्या ग्राहकांच्या गरजा बदलत चालल्या आहेत. ऑनलाइन खरेदीत वाढ होत आहे. त्यामुळे डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्यासाठी सरकारतर्फे पाठबळ मिळावे. ऑनलाईन खरेदीत वाढ पाहता किरकोळ व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्याचा व्यवसाय टिकविण्यासाठी मायटेक्ससारख्या प्रदर्शनाची शृंखला महाराष्ट्र चेंबरने सुरु केली आहे. व्यापारी बंधूसाठी महाराष्ट्र चेंबरने 'मोफत बेवसाईट' उपलब्ध करुन दिली आहे. महाराष्ट्र चेंबरने २९ देशांसोबत सामंजस्य करार (MOU) केले आहे. काही देशांत निर्यातीची संधी उपलब्ध करुन दिली आहे. महाराष्ट्र चेंबरचे लवकरच जकार्ता येथे कार्यालय स्थापन होत आहे. राज्यात अनेक ठिकाणी औद्योगिक वसाहतींना स्थानिक स्वराज्य संस्था आणि एम आयडीसी अशी दुहेरी कर आकारणी केली जाते. ही तत्काळ रद्द होणे आवश्यक आहे.

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी महाराष्ट्र चेंबर आणि कृषी विद्यापीठातर्फे येत्या काही दिवसांत विविध विषयांवर संयुक्त उपक्रम राबविले जातील व इन्क्युबेशन सेंटर ही लवकरच सुरू करता येईल, त्यासाठीही संयुक्त करार केला जाणार असल्याचे सांगितले. महाप्रीतचे दीपक कोकाटे यांनी 'रूफ टॉप सोलर'ची माहिती सांगितली. महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी प्रास्ताविक केले. चित्रा खरे यांनी सूत्रसंचालन केले मायटेक्सचे पुणे विभागाचे संयोजक दिलीप गुप्ता यांनी आभार मानले.

## सर्वसमावेशक एक्स्पो प्रदर्शन...

विविध नामांकित व्यापारी, उद्योजक, शिक्षण संस्था, कृषी प्रक्रिया उद्योग, उद्योजक, बांधकाम उद्योजक, आयटी, शिक्षण ऑटोमोबाईल, गृहप्रकल्प, सोलर क्षेत्रासह अन्य क्षेत्रातील उद्योजकांचा यामध्ये सहभाग होता. व्यापार, उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगांच्या नवीन संधीसह विविध विषयावर सेमिनार होणार असून व्यापार, उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगांना व्यवसाय वृद्धीची संधी 'मायटेक्स एस्क्पो' द्वारे उपलब्ध करून देण्यात आले.






मायटेक्स एक्स्पो, पूणे मध्ये थेट उद्योगमंत्र्याशी संवाद कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांच्या हस्ते सत्कार झाला.व्यासपीठावर उपस्थित मनोहर जगताप, शुभांगी तिरोडकर, करुणाकर शेट्टी, राजेंद्र बाठिया आदि पदाधिकारी.

# महाराष्ट्र सरकार उद्योजक आणि व्यापाऱ्यांसोबत असून बैठकीतून सर्व प्रश्न मार्गी लागतील : उद्योगमंत्री उदय सामंत

**पुणे :** शासन शंभर टक्के उद्योजक आणि व्यापाऱ्यांसोबत आहे. विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी लवकरच मुंबईत संबंधित सर्व विभागांचे अधिकारी, सचिवांसोबत बैठक घेतली जाईल. या बैठकीतून उद्योग, व्यापाराचे बहुतांशी प्रश्न मार्गी लागतील, अशी ग्वाही राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, महाराष्ट्र शासन उद्योग विभाग आणि एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड 'मायटेक्स एक्स्पो' या भव्य प्रदर्शनाला विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी भेट देऊन उद्योजकांसोबत संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रमुख पाहुण्यांचे मायटेक्सचे स्मृतिचिन्हे, शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते 'मायटेक्स एक्स्पो मुंबई २०२४' च्या माहितीपत्रिकाचे अनावरण करण्यात आले. शिवाजीनगरातील सिंचन भवन येथील मैदानावर २९ ऑक्टोबर पर्यंत प्रदर्शन झाले.

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र चेंबर राज्यातील व्यापार आणि उद्योगांच्या वाढीसाठी संयुक्तपणे काम करत आहे. महाराष्ट्र चेंबरच्या कामाचा फायदा शासनालाही होत असून महसूल वाढीबरोबरच, तरुणांना रोजगार मिळत आहे. राज्यात उद्योग, व्यवसायांना मोठे प्रोत्साहन मिळत आहे. उद्योगांचे अनेक प्रश्न शासनाकडून मार्गी लागले आहेत आणि उर्वरित प्रश्नही लवकरच मार्गी लागतील. विविध सवलती, प्रोत्साहनाचे ७ हजार ५०० कोटी रुपये उद्योजकांच्या खात्यात वर्ग केला आहे.

उद्योगमंत्री पुढे म्हणाले, प्रकल्प उभारताना त्या गावातील स्थानिकांना ८० टक्के प्राधान्य दिल्यास वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत. उद्योग व व्यापाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे शासनाची भूमिका आहे. खासगी क्षेत्रात सेमी कंडक्टरचा प्रकल्प उभारण्यासाठी आर्यन ग्रुप ऑफ कंपनीने घेतलेल्या पुढाकाराला पाठबळ दिले जाईल, असेही त्यांनी सांगितले. विधानपरिषदेच्या उपसभापती म्हणून डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी उद्योग विस्ताराला चालना देण्यासाठी त्यांची धडपड असते. उद्योग विभागाच्या समस्यांबाबत डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात बैठक घेण्यात यावी, असेही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

### नो अँटी चेंबर, ना नेत्यांची भेट..
### थेट उद्योजकांच्यात खात्यात पैसे जमा

सरकारने उद्योग, व्यवसायासाठी काही तत्काळ निर्णय घेतले आहेत. तत्कालीन सरकारच्या काळात २०२१ मध्ये तत्कालीन उद्योमंत्र्याच्या काळात यवतमाळ येथील जागा मिळविण्यासाठी उद्योजकांना मोठा त्रास सहन करावा लागला. तत्कालीन सरकारच्या कार्यपध्दतीमुळेच अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेले. मात्र आमच्या सरकारने कधीही उद्योजकांना अँटीचेंबर आणि नेत्यासोबत बैठकीसाठी प्रवृत्त केले नाही. त्यामुळेच उद्योगांचे अनेक प्रश्न आमच्या सरकारकडून मार्गी लागले आहेत आणि उर्वरित प्रश्नही लवकरच मार्गी लागतील. प्रोत्साहन अनुदानाचे ७ हजार ५०० कोटी रुपये उद्योजकांच्या खात्यात जमा झाले. त्यासाठी त्यांना कोणालाही मध्यस्थ घ्यावे लागले नसल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे म्हणाल्या,







**मायटेक्स एक्स्पोमध्ये थेट उद्योगमंत्र्याशी संवाद कार्यक्रमात राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांचा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सत्कार झाला. दुसऱ्या छायाचित्रात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांचा सत्कार चेंबरचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांच्या हस्ते सत्कार झाला.व्यासपीठावर उपस्थित मनोहर जगताप, शुभांगी तिरोडकर, करुणाकर शेट्टी, राजेंद्र बाठिया आदी पदाधिकारी.**

महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे जिथे महिला उद्योग धोरण तयार करण्यात आले आहे. आगामी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी उद्योजक महिलांसोबत परिषद ठेवण्यात आलेली आहे. यामध्ये उदयोग क्षेत्रातील यशस्वी महिला त्यांना आलेले अनुभव मांडतील. प्रकल्प जातो तेव्हा त्याची जेवढी प्रसिद्धी होते तेवढी तो प्रकल्प येताना झाल्याचे दिसत नाही. तसेच येत्या ३० ऑक्टोबरला व्यापार आणि उद्योजकांच्या प्रश्नावर सचिवांसोबत बैठक घेतली जाईल. ऑनलाइन व्यापाराच्या आव्हांनाला तोंड देण्यासाठी सरकारकडून काय मदत करता येईल, याबाबत चर्चा करण्यात येईल.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व्यापारी आणि उद्योजकांसाठी कार्यरत आहे. मायटेक्सच्या माध्यमातून राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राला चालना देणे, प्रोत्साहन देण्यात येत आहे. उद्योगमंत्री उदय सामंत हे तत्काळ निर्णय घेणारे मंत्री असल्याने उद्योग क्षेत्राला मोठे चैतन्य आले आहे. व्यापार्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांच्या माध्यमातूनच मायटेक्सची संकल्पना रुजली. व्यापार आणि उद्योगांच्या प्रश्नी सरकार दरबारी संयुक्त बैठक घ्यावी. व्यापाऱ्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी उद्योगमंत्री सावंत यांच्या माध्यमातूनच मायटेक्सची संकल्पना रुजली, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान उद्योग क्षेत्रातील विविध संघटनांनी मागण्यांचे निवेदन उद्योगमंत्री उदय सामंत यांना दिले. मान्यवरांच्या हस्ते आर्यन ग्रुप ऑफ कंपनीचे चेअरमन मनोहर जगताप, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्षा शुभांगी तिरोडकर, करुणाकर शेट्टी, महाराष्ट्र चेंबरचे मायटेक्सचे पुणे विभागाचे मुख्य संयोजक दिलीप गुप्ता, महाराष्ट्र चेंबरचे सेक्रेटरी जनरल सागर नागरे, एक्स्पो इंडियाचे जावेद शेख आदींचा सत्कार झाला. डॉ. विजयकुमार मालपुरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गोविंद पानसरे यांनी आभार मानले.

## डायमंड ज्वेलरीचा हब स्थलांतरित होत असल्याचा प्रचार चुकीचा : उद्योगमंत्री उदय सामंत

डायमंड ज्वेलरीचा हब गुजरात राज्यात स्थलांतरित होत असल्याचा प्रचार चुकीचा आहे, असे सांगून उद्योगमंत्री श्री. सामंत म्हणाले, महाराष्ट्र शासनाने डायमंड ज्वेलरीमध्ये उत्तम काम करण्याचा निर्णय घेतला, त्यासाठी धोरण आणले. नवी मुंबई येथे नव्याने विकसित होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळानजिक २५ एकरची जागा डायमंड ज्वेलरी पार्कसाठी दिली आहे. पुढील वर्षीपासून महाराष्ट्रातील डायमंड ज्वेलरी मधील व्यापार प्रचंड वाढणार असून जगातील या क्षेत्रातील पाचव्या क्रमांकावर राज्य असेल असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याचे मंत्री सामंत म्हणाले.







**प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मायटेक्स एक्स्पो मुंबई २०२४ च्या माहितीपत्रिकाचे अनावरण करण्यात आले. या वेळी उपस्थितात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, रवींद्र माणगावे, मनोहर जगताप, शुभांगी तिरोडकर, करुणाकर शेट्टी, राजेंद्र बाठिया, जावेद शेख, सागर नागरे.**


HAPPY
Diwali
MAY THE RADIANT LAMP ILLUMINATE YOUR COURTYARD!
MAY HAPPINESS, PROSPERITY, AND JOY SHOWER UPON YOUR LIFE!
Metaroll® TMT
THE POWER OF STEEL
Metarolls Ispat Private Limited
Gut No. 48, Adjacent to M.I.D.C., Phase II, Daregaon, Jalna - 431213 (MH) India.
E : info@metarolls.com, info@threadedrebars.com | W : www.metarolls.com, www.threadedrebars.com
IS: 1786
IS: 2830
THERMEX®
TÜV SÜD
SGS




**मायटेक्स एक्स्पोमध्ये थेट उद्योगमंत्र्याशी संवाद कार्यक्रमात मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, व्यासपीठावर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांच्या हस्ते सत्कार झाला. व्यासपीठावर उपस्थित मनोहर जगताप, शुभांगी तिरोडकर, करुणाकर शेट्टी, राजेंद्र बाठिया आदि पदाधिकारी.**

# मायटेक्स एक्स्पो- पूणे मध्ये कोट्यावधीची ऊलाढाल, लाखो नागरिकांनी दिली भेट

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीचे अध्यक्ष ललित गांधी यांची माहिती

**पुणे :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर, महाराष्ट्र शासन उद्योग विभाग आणि एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड 'मायटेक्स एक्स्पो' या भव्य प्रदर्शनात कोट्यावधी रुपयांची ऊलाढाल झाली तर लाखो नागरिकांनी भेट दिली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगरातील सिंचन भवन येथील मैदानावर भव्य प्रदर्शन झाले.

विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी प्रदर्शनाला भेट देऊन त्यांनी उद्योजकांसोबत संवाद साधला. निवृत्त अपर पोलिस महासंचालक आणि राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य भगवंतराव मोरे यांनी भेट देऊन एक्स्पोच्या नियोजनाचे कौतुक केले.

गुजरात सरकारचा औदयोगिक विस्तार कुटीर आणि ग्रामीण उद्योग, भारत सरकारच्या वस्त्र आणि हस्तशिल्प विभाग, भारत सरकारचा राष्ट्रीय ज्युट बोर्ड, राहुरीचे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, एक्स्पो इंडिया एक्झीबिशन प्रायव्हेट लिमिटेड हे एक्स्पोचे सहप्रायोजक होते. महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, महाराष्ट्र चेंबरचे मायटेक्सचे पुणे विभागाचे मुख्य संयोजक दिलीप गुप्ता, डॉ. विजयकुमार मालपुरे, डॉ. गोविंद पानसरे, शामला देसाई, सूरज तामगावे, मनीष पाटील, महाराष्ट्र चेंबरचे सेक्रेटरी जनरल सागर नागरे आदींनी संयोजन केले. देशातील उद्योग व्यवसायाशी निगडीत वस्तू, उत्पादने आणि तंत्रज्ञान पाहण्याची आणि खरेदी करण्याची संधी मायटेक्स एक्स्पोमध्ये नागरिकांना मिळाली. प्रदर्शनात देशी आणि परदेशातील हजारो उत्पादने उपलब्ध करुन देण्यात आली. विविध उद्योजक, कंपन्या, संस्था आणि व्यापारी बंधूचे ३२५ हून अधिक स्टॉल उपलब्ध करुन देण्यात आले. आर्टस्, क्राफ्टस् आणि कल्चर या विषयावरील स्टॉलचा समावेश होता. प्रदर्शनात इंटरनॅशनल पॅव्हेलियन, इलेक्ट्रॉनिक्स आणि ड्युरेबल्स, विविध राज्यांचे सरकारी स्टॉल, टेक्सटाइल, फॅशन, ऑटोमोबाइल, रिअल इस्टेट, बिल्डींग मटेरिअल, प्रोसेस फूड, ट्रॅव्हल अँण्ड टुरिझम, स्टेशनरी, गिफ्ट आर्टिकल्स आदी प्रमुख उत्पादने होती. महाराष्ट्रासह गोवा, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, लेह, लडाखसह, पंजाब, राजस्थान, तेलंगणा, उत्तरप्रदेश आदींसह विविध राज्यातील उद्योजक, व्यापारी सहभागी झाले.

आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कंपन्यांची उत्पादने, नवोदित उद्योजकांची उत्पादने पाहण्याची संधी नागरिकांना मिळाली. पदार्थांपासून ते कृषी, पर्यटन, गृहोपयोगी वस्तूंचे दर्शन घडविणारी उत्पादने प्रदर्शनाचे आकर्षण ठरले. व्यापार, उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योजक, बांधकाम, आयटी, शिक्षण ऑटोमोबाईल, गृहप्रकल्प, सोलार क्षेत्रासह अन्य क्षेत्रातील उद्योजकांचा समावेश होता.'मायटेक्स'च्या माध्यमातून राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राला चालना आणि प्रोत्साहन मिळाले. उद्योजक व्यापारी आणि विशेषतः नवउद्योजकांच्या नवीन उत्पादनांना चालना देऊन त्यांचे मनोबल मायटेक्सने निश्चितच वाढले आहे.




HAPPY Diwali
May the light lead you onto the road of growth and prosperity.
SHIPAIR
complete exim solution
SHIP AIR FORWARDERS PVT. LTD.
CB No. AARCS3336FCH001 (11/851)
www.shipair.in
▪ Custom Clearance ▪ Freight Forwarding ▪ Warehousing ▪ Transportation ▪ Exim Consultant ▪ Allied Services
110, Mahinder Chamber, W. T. Patil Marg, Chembur (E), Mumbai-400 071.
+91 22 6221 5316 / 17 / 18 +91 22 6886 5252
info@shipair.in Freight Booking : freight@shipair.in
TÜV AUSTRIA
ibcci
IFCBA
usiic
AEO
BCBA
MACCIA

# डायमंडचे देशातील सर्वात मोठे क्लस्टर नवी मुंबईत - नाम. उदय सामंत



**पुणे :** डायमंडचे देशातील सर्वात मोठे क्लस्टर नवी मुंबईतील महापे येथे स्थापित होणार असून यामुळे २० हजार कोटींची गुंतवणूक आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे एक लाख लोकांना रोजगार मिळेल. येथे स्थापित होणा–या उद्योगांना महाराष्ट्र शासनाने काही सवलती व प्रोत्साहने सुद्धा जाहीर केली आहेत, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी पुणे येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

उद्योगमंत्री उदय सामंत सामंत म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र आजही थेट परकीय गुंतवणुकीत देशात क्रमांक एकवर आहे. रत्ने व आभूषणे क्षेत्रातील केंद्र शासनाची शिखर संस्था म्हणजेच जेम्स अँड ज्वेलरी एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलद्वारे इंडिया जेम्स अँड ज्वेलरी पार्क नवी मुंबई येथे स्थापित करण्यात येत आहे. या पार्कमध्ये सुमारे २ हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक स्थापित होणार आहेत. तसेच येथे मोठ्या नामांकित कंपन्या सुद्धा गुंतवणूक करतील. अशा प्रकारचा देशातील हा एकमेव प्रकल्प आहे, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

**इंडिया जेम्स अँड ज्वेलरी पार्ककरिता महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली प्रोत्साहने**

या पार्ककरिता १ मार्च २०१९ रोजी झालेल्या उद्योग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत जेम्स अँड ज्वेलरी पार्ककरिता महाराष्ट्र शासनाने महापे येथे मोकळ्या भुखंडाचे औद्योगिक भुखंडात रुपांतर करून ८६ हजार ५३ चौरस मीटर एवढी जागा निश्चित करून दिली आहे. मात्र अशा उद्योगांसाठी केवळ जागा उपलब्ध करून होणार नाही तर या उद्योगांना काही प्रोत्साहन आणि सवलती देणे आवश्यक आहे, असा विचार करून उद्योग मंत्रिमंडळ उपसमितीने या उद्योगांसाठी २८ जून, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत सवलती जाहीर केल्या आहेत. जेम्स अँड ज्वेलरी पार्क करिता मुद्रांक शुल्कात सवलत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला. या पार्ककरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे ३ चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) यापूर्वी दिलेला आहे. अतिरिक्त २ एफएसआय देण्याचा निर्णय घेतला. याअतिरिक्त २ एफएसआयपैकी १ एफएसआय लॅब ग्रोन डायमंडस् उद्योगासाठी वापरण्यात येईल. उर्वरीत १ अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन विकसित केलेले क्षेत्र एमआयडीसीला विनामूल्य हस्तांतरीत करण्यात येईल. सदर विकसित क्षेत्र जेम्स एण्ड ज्वेलरी तसेच लॅब ग्रोन डायमंड क्षेत्राशी निगडीत अन्य उद्योगांना देण्याकरीता राखीव ठेवण्यात येईल. स्थापित होणाऱ्या घटकांकरीता पहिल्या भाडेपट्टा करारावर मुद्रांक शुल्क सवलत असेल. पार्कमधील घटकांना ५० टक्के ढोबळ वस्तू व सेवा कराचा परतावा ५ वर्षेपर्यंत देण्यात येईल. लॅब ग्रोन डायमंडस् उद्योग हा नवीन सेक्टर राज्यात विकसित होण्याकरीता एक विशेष बाब म्हणून या घटकांसाठी २ रुपये प्रति युनिट दराने ५ वर्षांसाठी विद्युत दरात सवलत देण्यात येणार. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांसाठी विद्युत शुल्क माफी ५ वर्षे दिली जाईल. सर्व प्रोत्साहने प्रति घटक पात्र गुंतवणूकीच्या १०० टक्के मर्यादेत देय करण्याचा निर्णय सुद्धा मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला आहे, असेही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज सांगितले.

**उदय सामंत यांच्या काळातच सर्वाधिक प्रश्न मार्गी : ललित गांधी**

यावेळी पत्रकारांनी राज्यातील उद्योग आणि व्यापारा संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर उदयोगमंत्री उदय सामंत म्हणाले की, माझ्यापेक्षा राज्यातील व्यापार आणि उद्योगाची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेचे अध्यक्ष ललित गांधी आपल्याला या प्रश्नाचे खरे उत्तर देऊ शकतील, असे सांगितले. त्या वेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, राज्याचे उद्योगमंत्री म्हणून उदय सामंत यांनी जबाबदारी स्विकारल्यानंतर राज्यातील उद्योगांचे सर्वाधिक प्रश्न मार्गी लागले आहेत.

गेल्या ३५ वर्षाच्या इतिहासात सर्वाधिक प्रश्न त्यांच्याच कारकीर्दीत पूर्ण झाले आहेत. हे सरकार उद्योगांना अधिकाधिक प्रोत्साहन देत आहे. महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्र चेंबर उद्योग, व्यापाराच्या वाढीसाठी सयुंक्तपणे उपक्रम राबवित आहे. नवीन उद्योगासाठी सरकारनेच महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाला इंडोनेशिया येथे दौऱ्यासाठी पाठविले. १३ उदयोजकांना उत्पादनाची ऑर्डर मिळाली आहे. सरकार उद्योगांना पूरक भूमिका घेत आहे. उद्योगांसाठीचे प्रलंबित असलेले दोन वर्षाचे प्रोत्साहन अनुदान एक रुपयाही खर्च न करता उद्योजकांच्या खात्यात जमा झाले. त्यामुळे उदय सामंत हे कार्यक्षम उद्योगमंत्री असून ते राज्याच्या उद्योग क्षेत्राला क्रमांक एकवर ठेवतील, असा सार्थ विश्वास आहे.

# वीज बिलाच्या कटकटीतून मुक्त व्हा, सोलर रुफ टॉप बसवा

## महाप्रीतचे दीपक कोकाटे यांचे आवाहन

**पुणे :** दर महिन्याच्या वीज बिलाची कटकट कायमची संपवायची असेल तर शासनाच्या ऊर्जा मंत्रालयाची सोलर रूफ टॉप योजनेचा लाभ घेणे गरजेचे आहे. सौर रूफटॉपसाठी सबसिडी योजना असून भारतात सौरउर्जेला चालना दिली जात आहे. महागाईच्या काळात या योजनेच्या माध्यमातून वीज बिलावर मात करणे आता शक्य झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाप्रीत संस्थेचे दीपक कोकाटे यांनी केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चर, महाराष्ट्र शासन उद्योग विभाग आणि एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड 'मायटेक्स एक्स्पो' मध्ये व्याख्यान झाले. शिवाजीनगरातील सिंचन भवन येथील मैदानावर 'मायटेक्स एक्स्पो' मध्ये आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी होते.

दीपक कोकाटे म्हणाले, उन्हाळी हंगामात दर महिन्याला येणाऱ्या वीजबिलाबाबत अनेकदा लोक चिंतेत असतात. सोलर पॅनल बसविण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जात आहे आणि कोणीही यासाठी अर्ज करून आपल्या छतावर सोलर पॅनल बसवून महागड्या विजेपासून मुक्ती मिळवू शकते. वीज संकटावर मात करण्यासाठी हरित ऊर्जा खूप उपयुक्त ठरते. घराच्या छतावर सोलर पॅनल लावून आवश्यक वीज निर्मिती करू शकतात. यासाठी सरकार तुमचा खर्च कमी करण्यासाठी सोलर पॅनलवर सबसिडीही देते. घराच्या छतावर सोलार पॅनल लावून तुम्हाला आवश्यक असलेली वीज सहजपणे निर्माण करू शकता. या कामात सरकार तुम्हाला मदत करण्यास सज्ज आहे. दीपक कोकाटे पुढे म्हणाले, मोनोपार्क बायफेशियल सोलर पॅनेल हे सध्याचे नवीन तंत्रज्ञान असलेले सोलर पॅनेल आहेत. यामध्ये पुढच्या आणि मागच्या दोन्ही भागातून वीज निर्माण होते. अशी चार सोलर पॅनल एकत्र ठेवल्यास तुम्हाला दररोज ६-८ युनिटपर्यंत वीज सहज मिळेल. हे चार सोलर पॅनल सुमारे दोन किलोवॅटचे असतील.

**अनुदानासाठी अर्ज कसा कराल...**

तुम्हाला सोलर रुफटॉप योजनेचा लाभ घ्यायचा असेल, तर त्यासाठी तुम्हाला Solarrooftop.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी लागेल. या वेबसाइटला भेट दिल्यानंतर, तुमच्या राज्याच्या लिंकवर क्लिक करा. पुढे ऑनलाइन अर्ज करण्याचा पर्याय निवडा. त्यानंतर तुम्हाला अर्जामध्ये तुमचे सर्व आवश्यक तपशील भरून कागदपत्रे अपलोड करावी लागतील. शेवटी सबमिट पर्यायावर क्लिक करावे लागेल. या प्रक्रियेचे अनुसरण करून तुम्ही सोलर रूफटॉप योजनेसाठी सहजपणे अर्ज करू शकता.

# महाराष्ट्र चेंबर आणि कृषी विद्यापीठातर्फे लवकरच इन्क्युबेशन सेंटर

## राहुरीचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील

**पुणे :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्यात लवकरच 'इन्क्युबेशन सेंटर' सुरु करण्याबाबत सामंजस्य करार केला जाईल. त्यासह महाराष्ट्र चेंबर आणि कृषी विद्यापीठातर्फे विविध सयुंक्त उपक्रम राबविले जातील, असे प्रतिपादन राहुरीचे कुलगुरु डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी केले. मायटेक्स एक्स्पोच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील म्हणाले महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठातर्फे 'इन्क्युबेशन सेंटर' सुरु केले जाणार आहे. राज्यात उद्योग आणि व्यापार क्षेत्रातील शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबरकडून विद्यार्थ्यांना अध्यापनाचे चांगले धडे मिळू शकतील. अनुकूल बदल घडवून आणण्यासाठी या पंखांना बळ देण्याचे काम 'इनोव्हेशन सेंटर' करते. नवीन कल्पना घेऊन येणाऱ्या युवकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या संशोधनाला साथ देऊन नवीन उद्योजक निर्माण व्हावेत, असा प्रयत्न आहे. महाराष्ट्रातील अनेक संशोधन संस्था, शिक्षण संस्थाना भेट देऊन तेथील चांगल्या बाबी या इन्क्युबेशन सेंटरमध्ये आणण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये ज्ञान, विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्यातील संशोधनवृत्ती वाढण्यासाठी 'इन्क्युबेशन सेंटर' महत्वाचे ठरते. त्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स सारख्या मोठ्या संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवनवीन माहिती मिळू शकेल. राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील म्हणाले, महात्मा फुले कृषी विद्यापीठाने १०१ ड्रोन पायलट तयार केले आहेत. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आतापर्यंत शेतकरी बांधवांना पिकावर फवारणी करण्यासाठी पाठीवरील चार्जिंग पंप, डिझेल चलित फवारणी पंपांचा वापर करावा लागत होता. मात्र आता हे दिवस आठवणीत जमा झाले आहेत. शेतकऱ्यांना फवारणी करण्यासाठी ड्रोनचा वापर शक्य झाले आहे. त्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देखील शासनाकडून दिले जाणार आहे. त्यामध्ये राहुरीचे महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा समावेश आहे. दरम्यान कृषी विद्यापीठाने सौर उर्जा प्रकल्प उभारणीसाठीही जागा दिली आहे. लवकरच विद्यार्थ्यांनी केलेले नवे संशोधन सर्वांसमोर येईल, असेही त्यांनी सांगितले.

**कौतुक 'महाराष्ट्र चेंबर पत्रिके' चे..**

'महाराष्ट्र चेंबर पत्रिके' चे कौतुक कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी केले. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कृषी विषयक योजना, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचे लेख, त्यांना मिळालेले पुरस्कार आणि तळागाळापर्यंत इत्थंभूत माहिती पोहोचविण्याचे काम महाराष्ट्र चेंबर करत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

# HIGHER INTEREST RATE

ON SAVINGS ACCOUNT
FROM RBL BANK!

**7.5%*** p.a.

**Scan QR code**
To Open RBL Bank
Digital Savings Account

*apno ka bank* | RBL BANK

**Visit: www.rblbank.com | Shivaji Park Branch - 98207 55304**

*Applicable on savings balances above Rs. 25 lakhs and upto Rs. 2 crores. Terms & Conditions apply.
**CIN:** L65191PN1943PLC007308




**'आत्मनिर्भर भारत कॉन्फरन्स २०२३' मध्ये मार्गदर्शन करताना केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नाम. नारायण राणे व्यासपीठावर उपस्थित चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, मैत्री कक्षाचे अध्यक्ष दीपेंद्रसिंह कुशवाह, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे विजय कळंत्री एएफएमटी अध्यक्ष हुजेफा सॅम्पलवाला आदी मान्यवर.**

# फर्निचर उद्योगाला सर्वोतोपरी सहकार्य करु : केंद्रीय मंत्री नारायण राणे

## देशाला आत्मनिर्भर बनविण्यात एमएसएमईचे मोठे योगदान : ललित गांधी

## 'आत्मनिर्भर भारत कॉन्फरन्स २०२३' उत्साहात संपन्न

**मुंबई :** फर्निचर उद्योगाला सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल असे प्रतिपादन केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नाम. नारायण राणे यांनी केले.

'आत्मनिर्भर भारत कॉन्फरन्स २०२३' मध्ये ते बोलत होते. 'अवेरनेस अँण्ड बेनिफिटस् ऑफ एमएसएमई स्कीम इन फर्निचर' असा कॉन्फरन्सचा विषय होता. केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नाम. नारायण राणे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी फर्निचर उद्योगाला सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असे ठोस आश्वासन दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणादायी आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्यासाठी आणि सर्व बाबतीत आत्मनिर्भर बनवण्यासाठी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे मोठे योगदान आहे आणि भविष्यातही राहणार आहे, असे गौरवोद्गागार महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी काढले. तसेच असोसिएशन ऑफ फर्निचर मॅन्युफॅक्चरर्स अँड ट्रेडर्सला महाराष्ट्र चेंबरतर्फे सर्वोतोपरी मदत केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उद्योग विकास आयुक्त तसेच मैत्री कक्षाचे अध्यक्ष दीपेंद्रसिंह कुशवाह, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे विश्वस्त आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, रुपा नाईक, असोसिएशन ऑफ फर्निचर मॅन्युफॅक्चरर्स अँड ट्रेडर्सचे अध्यक्ष (एएफएमटी) अध्यक्ष हुजेफा सॅम्पलवाला, सचिव अमित आर बारोट, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे विजय कळंत्री आदी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ही कॉन्फरन्स संपन्न झाली.



**'आत्मनिर्भर भारत कॉन्फरन्स २०२३' चे उद्घाटन करताना केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नाम. नारायण राणे, मैत्री कक्षाचे अध्यक्ष दीपेंद्रसिंह कुशवाह, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे विजय कळंत्री, एएफएमटी अध्यक्ष हुजेफा सॅम्पलवाला.**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'आत्मनिर्भर भारत' ची स्वप्नपूर्ती करण्यासाठी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय कार्यरत आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीने महाराष्ट्रातून घेऊन गेलेले विविध प्रश्न तत्काळ सोडविण्यासाठी त्यांनी अविरतपणे प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्रातील उद्योग, व्यापाराचे काम त्यांनी कधीही प्रलंबित ठेवलेले नाही. महाराष्ट्र चेंबर गेल्या शंभर वर्षापासून व्यापार आणि उद्योग क्षेत्रासाठी कार्यरत आहे. नुकतेच मुंबई, नाशिक आणि त्यानंतर पुणे येथे 'मायटेक्स एक्स्पो' हे भव्य





**'आत्मनिर्भर भारत कॉन्फरन्स २०२३' मध्ये मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी समोर उपस्थित उद्योजक मान्यवर**

प्रदर्शन घेण्यात आले. त्यासाठी एमएसएमईचे मोठे सहकार्य लाभले आहे. भारतीय उद्योगांना बळ देण्यासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे मोठे योगदान मिळत आहे.

अधिक मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, फर्निचर इंडस्ट्रीला बूस्ट देण्याची गरज आहे. चीनमधील प्रत्येक शहरात फर्निचर तयार केले जाते. त्याच धर्तीवर 'क्लस्टर बेस डेव्हलपमेंट' ची निर्मिती केली पाहिजे. चीन पेक्षा भारतीय उद्योगांत चांगल्या दर्जाच्या उत्पादने तयार करण्याची परिपूर्ण क्षमता आहे. त्यामुळे भारतात अशा प्रकाराच्या क्लस्टरची गरज आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७ सप्टेंबर रोजी दिल्ली येथे भव्य कन्व्हेशन सेंटर (यशोभूमी) ची दिमाखदारपणे स्थापना केली. ट्रेड इंडस्ट्रीला परदेशात जाऊन एक्स्पो भरविण्याची गरज भासणार नाही, अशा पायाभूत सुविधा या ठिकाणी उपलब्ध करुन दिल्या आहेत. हे सेंटर उभे करण्यासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचेही मोठे योगदान आहे.

असोसिएशन ऑफ फर्निचर मॅन्युफॅक्चरर्स अँड ट्रेडर्सचे अध्यक्ष (एएफएमटी) अध्यक्ष हुजेफा सॅम्पलवाला म्हणाले, फर्निचर उद्योगाला सरकारने सहकार्य करण्याची गरज आहे. जागतिक स्तरावर स्पर्धात्मक फर्निचर उद्योग उभारण्याचे सामायिक उद्दिष्ट पूर्ण करु शकते. फर्निचर क्षेत्रातील एमएसएमईच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण असून चड्डए मंत्रालयाच्या पाठिंब्याने आम्ही आमचे कार्य पूर्ण करू शकतो. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने (MSME) व्यवसाय वृद्धीसाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. एएफएमटी देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. एमएसएमईच्या वाढीला चालना देण्यासाठी फर्निचर उद्योग मोठा हातभार लावू शकेल.

### आत्मनिर्भर भारताची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रयत्शील रहा : केंद्रीय मंत्री नारायण राणे

केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) मंत्री नारायण राणे म्हणाले, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या मदतीनं आत्मनिर्भर होऊन महासत्ता बनण्याची भारतामध्ये क्षमता आहे. देशाला महासत्ता बनवण्याचे सामर्थ्य, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रामध्ये आहे. त्यामुळं या उद्योगांमध्ये अधिकाधिक वाढ व्हावी, यादृष्टीनं लक्ष केंद्रित केले आहे. देशाच्या एकूण निर्यातीत एमएसएमई क्षेत्राचा वाटा वाढविण्याची गरज आहे. आपला देश आत्मनिर्भर भारत व्हावा अशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा असून, देशातील तरुणही या दिशेने काम करत आहेत. या बळावर आपण आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करु, असा विश्र्वास नारायण राणे यांनी व्यक्त केला.

नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणादायी आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्यासाठी आणि सर्व बाबतीत आत्मनिर्भर बनवण्यासाठी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय भविष्यासाठी लवचिक जागतिक पुरवठा साखळी तयार करण्यासाठी काम करत आहे. आत्मनिर्भर भारताची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी निर्यातीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एमएसएमई क्षेत्रातील प्रगत उत्पादन क्षमतांना प्रोत्साहन देण्यासाठी रचनात्मक उपाय योजनांसाठी उद्योग मंत्रालय कार्यरत असल्याचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी सांगितले.

**कॉन्फरन्समध्ये सहभागी झालेल्या संस्था**

- महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर (MACCIA),
- WTC (वर्ल्ड ट्रेड सेंटर)
- FICCI – फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री
- DICCI – दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री
- CII – भारतीय उद्योग परिसंघ
- BIS – भारतीय मानक ब्युरो
- SME फोरम – लघु आणि मध्यम आकाराचे उद्योग
- CIT – कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स
- FFSC – फर्निचर आणि फिटिंग्ज कौशल्य परिषद
- RAI – रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया पेपरफ्राय, लाइव्ह स्पेस

# उद्योगाला चालना देण्यासाठी अधिकाधिक उपक्रम हाती घ्यावेत

## विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे



**विधानभवनात भारत आणि विविध देशांतील व्यापार-उद्योगास चालना देण्याच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत बोलताना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे. उपस्थितात उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बिपीन शर्मा, डॉ. जितेंद्र जोशी, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, पुणे चे सदस्य डॉ. विजय मालापुरे, महाराष्ट्र चेंबरचे सेक्रेटरी जनरल सागर नागरे.**

मुंबई : महाराष्ट्रात जागतिक गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने विविध देशांशी परस्पर समन्वय वाढण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत, स्टार्ट अप आणि नवोपक्रम सुरु करणाऱ्यांना विशेष प्रोत्साहन मिळावे, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी 'मॅग्नेटीक महाराष्ट्र' उपक्रम अधिक व्यापकपणे आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबवावा, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उद्योग विभागाला दिले. आगामी हिवाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला नागपूर येथे महिला उद्योजकांना व्यासपीठ मिळण्याच्या दृष्टीने नियोजन करावे आणि त्यात महाराष्ट्र उद्योग क्षेत्रात करत असलेल्या प्रगतीचा आढावा प्रदर्शनाच्या माध्यमातून घ्यावा, अशा सूचनाही त्यांनी सोमवारी झालेल्या बैठकीत केल्या.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानभवनात भारत आणि विविध देशांतील व्यापार-उद्योगास चालना देण्याच्या अनुषंगाने बैठक आयोजित केली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बिपीन शर्मा, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र जोशी, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, पुणे चे सदस्य डॉ. विजय मालापुरे, महाराष्ट्र चेंबरचे सेक्रेटरी जनरल सागर नागरे यांच्यासह उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उद्योग विकास आयुक्त श्री. दीपेंद्रसिंह कुशवाह दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

या बैठकीत उद्योगाशी निगडित असणाऱ्या उद्योजकांच्या विविध संस्था व उद्योग विभागांमध्ये समन्वय साधून व्यवसाय वाढीच्या दृष्टीने प्रयत्न व्हावा, या अनुषंगाने चर्चा झाली. यापूर्वी महाराष्ट्र आणि विविध देश यांच्यात झालेले सामंजस्य करार, सद्यस्थिती याबाबतही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी आढावा घेतला. आफ्रिकेत व्यवसायसंबंधी काय काम करता येईल. महिला उद्योजकांना उद्योग सुरु करण्याच्या अनुषंगाने अधिक सुलभता देणे, त्याअनुषंगाने धोरण राबविणे, परदेशात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सुविधा, विविध विद्यापीठे आणि शासकीय विभाग यांच्यामध्ये आदानप्रदान वाढवून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशीप प्रोग्राम राबविणे आवश्यक असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. राज्यातील पर्यटनवाढीच्या संधी लक्षात घेऊनही काम व्हायला हवे. उद्योजकांच्या संघटना आणि राज्य शासन यांनी यासंदर्भातील कार्यक्रम हाती घेऊन त्यासंदर्भातील कामाला गती द्यावी. महाराष्ट्रातील सहा विभागांमध्ये शासनाच्या विभागामार्फत कार्यशाळा आयोजित केली जावी. महिला उद्योजकांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने नागपूर येथे अधिवेशन काळात परिषद आयोजित करण्यात येणार असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.

प्रधान सचिव डॉ. कांबळे म्हणाले की, राज्याचे स्वत:चे उद्योग धोरण आहे. अधिकाधिक गुंतवणूक राज्यात यावी यासाठी विविध माध्यमातून आपण प्रयत्न करत आहोत. तैवान, जपान यांसह दक्षिण आशियाई देशांसोबत दर १५ दिवसांनी आढावा बैठक होत असतात. व्यवसाय संबंधित विविध परिषदांमध्ये उद्योग विभाग नेहमीच सहभाग घेत आलेला आहे. राज्याच्या विभागनिहाय उद्योगाची रणनीती ठरविण्यात आली आहे. लवकरच मॅग्नेटिक महाराष्ट्र हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. जोशी यांनी ग्लोबल इंडिया बिझनेस फोरम मार्फत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. तर डॉ. विजय मालापुरे यांनी राज्यातील उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी आणि उद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सहकार्य असेल, असे सांगितले.

**मायटेक्समध्ये दिले होते बैठकीचे आश्वासन**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरतर्फे आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपो (मायटेक्स) चे उद्घाटन महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते झाले होते. त्या वेळी त्यांनी भारत आणि विविध देशांतील व्यापार-उद्योगास चालना देण्याच्या अनुषंगाने लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन मायटेक्स एक्स्पो मध्ये दिले होते. त्यानुसार तातडीने मुंबईत ही बैठक घेण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, पुणे चे सदस्य डॉ. विजय मालापुरे, महाराष्ट्र चेंबरचे सेक्रेटरी जनरल सागर नागरे यांनी महाराष्ट्र चेंबर राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती सांगितली.

# आयटी पार्क, इलेक्ट्रिकल क्लस्टरसाठी जागांचे आरक्षण लवकरच : खासदार हेमंत गोडसे

## महाराष्ट्र चेंबरच्या मायटेक्सपो, नाशिक प्रदर्शनाचे शानदार उद्घाटन




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित 'मायटेक्स्पो २०२३ या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना खासदार हेमंत गोडसे, आमदार सीमाताई हिरे, आमदार देवयानी फरांदे, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, सोबत वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, करुणाकर शेट्टी, नितीन बंग, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, विश्वस्त विलास शिरोरे, खुशालभाई पोद्दार आदि मान्यवर.**

**नाशिक** : नाशिक जिल्ह्यात आयटी पार्क प्रकल्पासाठी १०० एकर तसेच इलेक्ट्रिकल इलेक्ट्रॉनिक क्लस्टरसाठी दिंडोरी तालुक्यातील आक्रळे येथे दोनशे एकर जागेचे आरक्षण लवकरच होईल, अशी घोषणा खासदार हेमंत गोडसे यांनी केली. शिलापूर येथे शंभर एकर जागेत साकारलेल्या इलेक्ट्रिकल टेस्टिंग लॅबचे उद्घाटन नोव्हेंबर किंवा डिसेंबरमध्ये होईल, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित 'मायटेक्स्पो २०२३ या प्रदर्शनाचे उद्घाटन खासदार हेमंत गोडसे यांच्या हस्ते तसेच आमदार सीमाताई हिरे, आमदार देवयानी फरांदे, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, करुणाकर शेट्टी, नितीन बंग, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, विश्वस्त विलास शिरोरे, खुशालभाई पोद्दार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. व्यासपीठावर या प्रमुख मान्यवरांसह शाखा चेअरमन संजय सोनवणे, समन्वयक सचिन शहा, सहसमन्वयक मिलिंद राजपूत, प्रायोजक दीपक चंदे, उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत उपस्थित होते. खासदार हेमंत गोडसे म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे आयोजित या प्रदर्शनामुळे उत्तर महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाला चालना मिळेल. उत्तर महाराष्ट्राचे द्वार म्हणून या एक्सपोला विशेष महत्त्व आहे. नाशिकात लवकरच रेल्वेचा रिपेअर कारखाना साकारणार असून त्याचे उद्घाटनही लवकरच होणार आहे. रेल्वे वेंडर्सना त्याचा निश्चितच लाभ होईल. दिल्ली– मुंबई औद्योगिक कॉरिडॉरमध्ये पहिल्या टप्प्यात नाशिकचा समावेश झाला नाही. मात्र दुसऱ्या टप्प्यात नाशिकचा समावेश व्हावा, यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आ. सीमाताई हिरे म्हणाल्या, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स उद्योजकांना नेहमीच प्रोत्साहन देते, ही भूषणावह बाब आहे. प्रदर्शनामुळे नवउद्योजकांसाठी निश्चितच महत्वाचे दालन खुले होणार आहे. अशाच पध्दतीने महाराष्ट्रभर आयोजन करावे, अशी अपेक्षा यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, उत्तर महाराष्ट्रातील व्यापारी व उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर नेहमीच पुढाकार घेते. नाशिकात लवकरच आयटी हब साकारणार असून त्यामुळे रोजगारासाठी



तरुणांना अन्यत्र जाण्याची आवश्यकता भासणार नाही. चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी प्रास्ताविक केले. या प्रदर्शनामुळे उत्तर महाराष्ट्रासाठी प्रगतीचे द्वार खुले होईल, असा विश्वास प्रदर्शनाचे चेअरमन संजय सोनवणे यांनी व्यक्त केला. सर्व क्षेत्रातील व्यापारी आणि उद्योजकांसाठी सर्व समावेशक असल्याने सर्वांना ते निश्चितच आवडेल, असेही सोनवणे यांनी अपेक्षा व्यक्त केली. वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांनी आभार मानले. उद्घाटनप्रसंगी निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ, ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र फड, कार्यकारिणी सदस्य संदीप भंडारी, ललित नहार, रवी जैन, निलेश चव्हाण, प्रकाश कलंत्री, नीलिमा पाटील, दीपाली चांडक, मिथिला कापडणीस, भरत येवला, राजेंद्र कोठावदे, भावेश मानेक, राजेश मालपुरे, अंजु सिंघल, सचिन जाधव, सौ. सुनीता फाल्गुने, स्वप्नील जैन, संदीप सोमवंशी आदींसह कार्यकारिणी सदस्य, व्यापारी, उद्योजक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दीपक बिल्डर्स अँड डेव्हलपर्स रियल इस्टेट



बांधकाम क्षेत्रातील ३५ वर्षांचा प्रभावशाली वारसा असलेले दीपक बिल्डर्स अँड डेव्हलपर्स रियल इस्टेटचे दीपक चंदे यांनी त्यांच्या दूरदृष्टीने दीपक बिल्डर अँड डेव्हलपरला बांधकाम क्षेत्रात नावलौकिक मिळवून दिला. नावीन्यपूर्ण आणि उत्कृष्ट दर्जाचे बांधकाम म्हणून दीपक बिल्डरचा नावलौकिक आहे. बांधकाम क्षेत्रात विकासाच्या स्पेक्ट्रममध्ये संकल्पनात्मकते पासून अत्याधुनिक डिझाईन आणि टिकाऊ पद्धतीसह बांधकामाचे नवे प्रयोग अंमलात आणले आहेत. त्यांच्या पत्नी दीपा चंदे, मुलगी ईशा चंदे, देवश्री चंदे आणि शुभ चंदे यांची त्यांना साथ लाभली आहे. दीपक चंदे हे सामाजिक कार्यातही अग्रेसर आहेत. व्यावसायिक कौशल्य आणि सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी बांधकाम व सामाजिक क्षेत्रात नाव कमविले आहे. **'मायटेक्स एक्सपो २०२३'** साठी मुख्य प्रायोजक म्हणून दीपक बिल्डर्स अँड डेव्हलपर्स चे दीपक चंदे यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

# पुणे-शिर्डी-नाशिकमध्ये फास्ट ट्रॅक रोडच्या प्रस्तावावर काम सुरू : सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे

## नाशिकमध्ये आयटी हब जलद गतीने व्हावे यासाठीही प्रयत्नशील

**मायटेक्स्पो, नाशिकचे मुख्य मार्गदर्शक नाम. दादाजी भुसे यांची भेट**

**नाशिक** : नाशिकच्या विकासासाठी आयटी हब जलद गतीने व्हावे यासाठी शासन प्रयत्नशील आहे. पुणे-शिर्डी-नाशिक फास्ट ट्रॅक रोड व्हावा, याचाही विचार असून त्याबाबतच्या प्रस्तावावर कामही सुरू आहे. रिंग रोडचा अभ्यासही करण्यात येत आहे, असे प्रतिपादन राज्याचे बांधकाम तथा नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांनी काढले.

पालकमंत्री दादाजी भुसे यांनी मायटेक्सपो प्रदर्शनाला भेट देऊन प्रत्येक स्टॉलधारकांशी चर्चा करून त्यांच्या उत्पादनाची माहिती जाणून घेत त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधला. या वेळी पालकमंत्री दादा भुसे यांचा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, कांतीलाल चोपडा यांच्या हस्ते सत्कार झाला.

सन २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या दृष्टीने आयटी पार्क आणि फास्ट ट्रॅक रोड प्रकल्पाचा नाशिककरांना निश्चितच फायदा होईल. औद्योगिक विकासाची असलेली गरज पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे राबवित असलेल्या उपक्रमांबद्दल नामदार भुसे यांनी चेंबरच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. त्यावेळी निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे आणि अजय बोरस्ते, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखाध्यक्ष संजय सोनवणे उपस्थित होते.



मायटेक्स्पो, नाशिक मधील मुख्य प्रायोजक दिपक बिल्डर्सच्या भव्य दालनाचे उद्घाटन करताना सार्वजनिक बांधकाम मंत्री नाम. दादाजी भुसे, ललित गांधी, दिपक चंदे, संतोष मंडलेचा, करूणाकर शेट्टी, देवश्री चंदे व अन्य पदाधिकारी.


hp Canon brother
SAMSUNG EPSON LEXMARK iball
DELL Logitech Microsoft Quick Heal
FE™
Forex Enterprises
Get Cartridges and Printer AMC Free
GeM Government e Marketplace
Dealer in : A to Z Office Stationery & Computer Stationery, New & Refilling, Multi Colour Xerox
Great Western Building, 132, Shahid Bhagat Singh Road, Opp. Lion Gate, Fort, Mumbai 400 023.
E-mail : forexenterprises@rediffmail.com • Website : www.forexenterprises.in
Tel.: 7710911040 / 9769634809
BRANCHES : WORLI DADAR ANDHERI VASHI

# उद्योजकांनी व्हेंडर डेव्हलपमेंट रजिस्ट्रेशन करावे : किरणकुमार राव

## करंसी प्रेस व्हेंडर डेव्हलपमेंट रजिस्ट्रेशन मीटचे राज्यभरात आयोजन करावे : ललित गांधी




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरतर्फे आयोजित 'मायटेक्स एक्स्पो' २०२३ नाशिक येथे चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करताना माहिती चित्रफितीद्वारे करन्सी नोट प्रेसचे प्रोक्रुटमेंट हेड किरणकुमार राव.**

**नाशिक** : करन्सी नोट प्रेसला पॅकिंग मटेरियल इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल वर्क्स अँड सर्व्हिस मेकॅनिकल वस्तू, मेकॅनिकल वर्क्स अँड सर्व्हिस, सिव्हील वर्क, केमिकल्स कंजूमेबल सर्व्हिस यासह विविध कामांसाठी व्हेंडरची गरज असते, त्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून व्हेंडरचे रजिस्ट्रेशन करणे गरजेचे असते. त्यासंदर्भात व्हेंडर रजिस्ट्रेशनची प्रक्रियेची व कामांची सविस्तर माहिती चित्रफितीद्वारे करन्सी नोट प्रेसचे प्रोक्रुटमेंट हेड किरणकुमार राव यांनी उपस्थितांना सांगितली. नाशिकमधील नवउद्योजकांनी व उद्योजकांनी व्हेंडर रजिस्ट्रेशन करावे, असे आवाहन केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरतर्फे आयोजित 'मायटेक्स एक्स्पो' २०२३ या प्रदर्शनामध्ये करन्सी नोट प्रेस व्हेंडर डेव्हलपमेंट मीट' मध्ये किरणकुमार राव बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे उपस्थित होते. सुरवातीला डॉ. मिथिला कापडणीस यांनी उपस्थितांचे स्वागत करुन व्हेंडर डेव्हलपमेंट रजिस्ट्रेशन सेमिनारची माहिती सांगितली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरने गेल्या ९६ वर्षांपासून राज्यातील व्यापार उद्योग व कृषी प्रक्रिया उद्योगांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. देश व जागतिक स्तरावर राज्यातील व्यापार उद्योगांना व्यासपीठ व स्थान मिळवून देण्याचे कार्य महाराष्ट्र चेंबरने केले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांचे काम व्हेंडरद्वारे केले जाते. मात्र त्याची माहिती सर्वांना नसते. त्यामुळे नवउद्योजक व एसएमइना हे काम मिळावे, या उद्देशाने आजच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले. तसेच व्हेंडर डेव्हलपमेंट रजिस्ट्रेशन मीटच्या माध्यमातून कामाची संधी मिळते. सर्वांनी त्यांचा लाभ घ्यावा. तसेच व्हेंडर डेव्हलपमेंट रजिस्ट्रेशन मीटचे संपूर्ण राज्यात आयोजन करावे, असे आवाहन केले.

उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी मुंबईतील मायटेक्स प्रदर्शनाच्या उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला त्यानंतर नाशिकमध्ये मायटेक्सचे आयोजन करून उत्तर महाराष्ट्र व्यापार, उद्योग कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन व चालना देण्याचे काम होणार असून विविध माहितीपूर्ण व नवीन व्यवसायाच्या संधी, व्यापार उद्योग वृद्धी करण्याच्या दृष्टीने विविध सेमिनारचे आयोजन करण्यात आले. त्याचा निश्चित फायदा स्थानिक व्यापारी उद्योजकांना झाला आहे. उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योगांच्या विकासासाठी व वृद्धीसाठी सातत्याने सेमिनारचे आयोजन करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी सचिन शहा, मिलिंद राजपूत, राजू व्यास, दीपाली चांडक, विजय बेदमुथा आदिसह कार्यकारिणी सदस्य व व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरतर्फे आयोजित 'मायटेक्स एक्स्पो' २०२३ नाशिक येथे चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी.**

# सोलरच्या माध्यमातून नवी क्रांती, वीजदरात बचतीसाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांनी लाभ घ्यावा : ललित गांधी

## सोलरायझेशन ऑफ एमएसएमइ राज्यस्तरीय उपक्रमाची नाशिकमधून सुरुवात

**नाशिक :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर आणि महाप्रीतच्या संयुक्त विद्यमाने सोलरायझेशन ऑफ एमएसएमइ या राज्यस्तरीय उपक्रमाची सुरुवात नाशिकमधून होत आहे. उद्योजकांनी या उपक्रमाचा फायदा घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

या अभिनव योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ व यासंबंधीची सर्व माहिती देण्यासाठीचा विशेष कार्यक्रम ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी महाराष्ट्र चेंबरतर्फे आयोजित 'मायटेक्स एक्स्पो' या डोंगरे वसतिगृह येथे सुरू असलेल्या प्रदर्शन स्थळी करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र चेंबरने गेल्या दोन वर्षात व्यापारी, उद्योजक, कृषी क्षेत्राच्या समस्या सोडविण्यासाठी विभाग निहाय परिषद घेतल्या. केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राच्या समस्या सोडविण्यावर भर दिला असून प्रामुख्याने वीजदर हा मोठ्या प्रमाणात भेडसावणारा प्रश्न असून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उद्योगमंत्री यांच्याशी चर्चा केली बैठका घेतल्या. वीज दरवाढीच्या प्रश्नांमध्ये राज्यातील उद्योगांना दिलासा देता येईल, अशा महत्त्वपूर्ण उपक्रमाची सुरुवात आज होत आहे. राज्यातील उद्योगांना सध्या द्याव्या लागणाऱ्या वीज दरामध्ये ४०% पर्यंतची सवलत मिळेल, अशा पद्धतीने रूफ-टॉप सोलर च्या माध्यमातून एक नवी क्रांती घडविली जाणार आहे. सोलर एनर्जीच्या माध्यमातून प्रतियुनिट सुमारे पाच रुपये दराने वीज उपलब्ध होऊ शकेल. त्याचा फायदा होणारा उत्पादन खर्चात बचत होणार असून अन्य राज्याच्या उत्पादनाच्या तुलनेत आणि स्पर्धेत टिकण्यास मोठी मदत होईल. पहिल्या टप्प्यात नाशिक, कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद व सांगली या शहरात सुरु होत आहे.

महाराष्ट्रातील उद्योगांना सर्वाधिक भेडसवणारी वीज दराची समस्या दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकार चा उपक्रम महाप्रीत व राज्याच्या व्यापार,उद्योग, कृषी उद्योग क्षेत्राची शिखर संस्था महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील उद्योगांना सोलर च्या माध्यमातून कमीत कमी खर्चात वीज उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. सोलर प्रकल्प उभारणीसाठी उद्योगांना कोणतीही भांडवली गुंतवणूक करावी न लागता अंदाजे पाच रुपये प्रति युनिट दराने वीज उपलब्ध करून देण्याचे नियोजन केल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, विजय बेदमुथा, दीपक शर्मा, डॉ. मिथिला कापडणीस, 'महाप्रीत'चे महाव्यवस्थापक तेजस शिंदे, वरिष्ठ तज्ञ नवनीत गुप्ता, वरिष्ठ ऊर्जा तज्ञ मुकेश खंडेलवाल, यशराज गोरे, स्वाती झा यांच्या प्रमुख उपस्थित होते.

'महाप्रीत'चे महाव्यवस्थापक तेजस शिंदे यांनी महाप्रीतची माहिती दिली. तसेच सोलरायझेशन ऑफ एमएसएमइ या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील लघु व मध्यम उद्योगांना स्वतः कोणतीही अतिरिक्त गुंतवणूक न करता एका विशेष व्यवस्थेमध्ये रूट ऑफ रफ-टॉप सोलरची यंत्रणा उभारून किमान ४० टक्के कमी दरामध्ये वीजपुरवठा होईल. यामध्ये जागतिक बँकेचा आर्थिक सहभाग आहे. त्यासाठी आवश्यक प्रक्रियेची माहिती चित्रफितीद्वारे दिली.

ग्लोबल एनर्जी अलायंन्स फॉर पीपल्सचे दीपक शर्मा यांनी एमएसएम इला मदत करण्यासाठी या उपक्रमाची सुरवात झाली असून तांत्रिक बाबी व प्रक्रियेची माहिती दिली. याप्रसंगी उपस्थित उद्योजकांनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे तेजस शिंदे व दीपक शर्मा यांनी दिले.

उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी महाराष्ट्र चेंबर तर्फे उत्तर महाराष्ट्राच्या विकासासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली व मायटेक्सपो २०२३ च्या माध्यमातून व सोलरायझेशन ऑफ एमएसएमइ राज्यस्तरीय उपक्रमातुन उद्योजकांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार त्याचा लाभ उद्योजकांनी घ्यावा असे सांगितले. व्यापारी, उद्योजक, कृषी प्रक्रिया उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तरुणांनी अन्न प्रक्रिया उद्योग सुरु करावेत - जगदीप पाटील, कृषी उपसंचालक



**सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनांची माहिती देतांना कृषी उपसंचालक जगदीश पाटील.**

नाशिक : तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योगाला प्राधान्य द्यावे. केंद्र सरकारच्या शेती व्यवसायासाठी खूप चांगल्या योजना आहेत. त्यामुळे ' तरुणांनी अन्नप्रक्रिया उद्योग सुरू करून उद्योजकतेकडे वळावे आणि नाशवंत मालाचे आयुष्य वाढवून अधिकाधिक उत्पन्न वाढीसाठी प्रयत्नशील रहावे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालास शाश्वत दर मिळण्यास प्रयत्न करावे' , असे आवाहन कृषी उपसंचालक जगदीश पाटील यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर तर्फे आयोजित 'मायटेक्स एक्सपो २०२३'डोंगरे वस्तीगृह येथे 'सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग' विषयावर आयोजित सेमिनारमध्ये ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, सेमिनार कमिटीच्या चेअरमन डॉ. मिथिला कापडणीस, सौ दीपाली चांडक, विजय बेदमुथा, राजेश मालपुरे, मिलिंद राजपूत उपस्थित होते.

अधिक मार्गदर्शन करताना कृषी उपसंचालक जगदीश पाटील म्हणाले, केंद्र शासनाच्या सहायित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत खाद्य प्रक्रिया उद्योग, धान्य, फळे, भाजीपाला प्रक्रिया उद्योगाच्या स्वरूपाचे प्रक्रिया उद्योग या योजनेत सहभागी होऊ शकतात. नाशवंत अन्नधान्य, भाजीपाला, फळे यांच्यावर प्रक्रिया करून वर्षभर वापरण्या योग्य तयार करण्याचे प्रक्रिया उद्योग सुरू करण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण व फायदेशीर आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांच्या मालाचा दर शाश्वत मिळण्यासाठी या योजनेचा फायदा होणार आहे. सध्या आधुनिकतेकडे तरुण वर्ग वळला असून उत्पादनांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तो कमी करण्याच्या दृष्टीने ही योजना फायदेशीर आहे. उच्चशिक्षित होऊन नोकरी करण्याकडे तरुणांचा कल वाढला असून तरुणांनी शेती व्यवसायातून उत्पादन वाढविणे व अन्नप्रक्रिया उद्योग सुरू करणे व ते ग्रामीण भागात सुरू केल्यास गाव खेड्याचाही विकास होईल यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना ही महत्त्वपूर्ण कार्य करत आहे, उपयुक्त ठरत आहे. या योजनेचा सर्वांनी फायदा घ्यावा. अन्नप्रक्रिया उद्योग सुरू करून उद्योजकतेकडे वळावे व नाशवंत मालाचे आयुष्य वाढवून उत्पन्न वाढवावे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालास शाश्वत दर मिळण्यास प्रयत्न करावे.

डॉ. मिथिला कापडणीस यांनी उपस्थितांचे स्वागत केले व या सेमिनारच्या माध्यमातून नव उद्योजकांना मार्गदर्शन व शेतीमालाला बाजारपेठ मिळावी, शाश्वत दर मिळावा तसेच नाशवंत मालावर प्रक्रिया करून उद्योग सुरू करण्यासाठी उपयुक्त योजना असून त्याचा सर्वांनी फायदा घ्यावा, असे आवाहन केले.

वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांनी महाराष्ट्र चेंबर तर्फे व्यापारी, उद्योजक, कृषी प्रक्रिया उद्योग यांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून विविध माध्यमातून बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे कार्य होत असल्याचे सांगितले. तसेच सेमिनारमध्ये उपलब्ध संधींची माहिती देण्यात येते. विविध देशात विविध देशातील मोठमोठ्या प्रदर्शनांमध्ये महाराष्ट्र चेंबरचे शिष्टमंडळ जाते व तेथे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते व निर्यातीसाठी प्रोत्साहन देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. दीपाली चांडक यांनी आभार मानले. सेमिनारसाठी व्यापारी, उद्योजक, शेतकरी, कृषी प्रक्रिया उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मायटेक्सपो-नाशिक प्रदर्शनला उदंड प्रतिसाद

# बक्षिसांची लयलूट, इलेक्ट्रिक बाईकच्या मानकरी ठरल्या मेधा परब

## लाखो नागरिकांनी प्रदर्शनाला दिली भेट

**नाशिक :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे आयोजित मायटेक्सपो-२०२३ प्रदर्शनाला उदंड प्रतिसाद लाभला. लाखो नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देऊन कौतुक केला. प्रदर्शनात बक्षिसांची लयलूट करण्यात आली.

सर्वांचे आकर्षण ठरलेल्या बंपर ड्रॉ मधून इलेक्ट्रिक बाईकच्या मानकरी नाशिकच्या मेधा परब ठरल्या.

शनिवारच्या सुटीची पर्वणी साधत डोंगरे वस्तीगृह मैदानावर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे आयोजित 'मायटेक्सपो-२०२३' प्रदर्शन बघण्यास लोकांनी एकच गर्दी केली होती. दरम्यान प्रदर्शनास भेट देण्यास येणाऱ्या नागरिकांच्या कूपन मधून दर तासांला लकी ड्रॉद्वारे अनेक भाग्यवान विजेत्यांना बक्षीस स्वरूपात भेटवस्तू देण्यात आल्या. ते या प्रदर्शनाचे खास वैशिष्ट्य राहिले. ६ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत नागरिकांच्या अलोट गर्दीत प्रदर्शनाला उदंड प्रतिसाद लाभला.

अनेक विजेत्यांना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते आकर्षक बक्षीसांचे वितरण करण्यात आले. बक्षीसांची सुमारे ११ लाख रुपये रक्कम होती. शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉ काढण्यात येईल व विजेत्याला इलेक्ट्रिक बाईक जिंकण्याची संधी मिळाली. प्रदर्शनात बंपर लकी ड्रॉ काढण्यात आला.



नाशिक मधील सुप्रसिद्ध हायासा ई मोबिलिटीतर्फे निर्भर या ई-बाईकच्या मानकरी सौ. मेधा परब या ठरल्या. त्यांनी इ-बाईकवरुन फेरफटकाही मारला. उपस्थितांनी टाळ्याच्या गजरात त्यांचे स्वागत केले.

हे प्रदर्शन म्हणजे राज्यातील इतर उद्योजकांसाठी आदर्शवत असेच आहे. महाराष्ट्र चेंबरच्या पुढाकाराने उत्तर महाराष्ट्र आणि विशेषतः नाशिकात औद्योगिक विकासाला चालना मिळत आहे, ही आनंददायी बाब असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी माध्यमांशी संवाद साधतांना सांगितले.

दरम्यान प्रदर्शनात उद्योजक आणि व्यापाऱ्यांचे सर्व समावेशक असे स्टॉल्स असल्याने त्याची माहिती जाणून घेण्यासाठी तसेच वस्तू खरेदी करण्यास नागरिकांनी गर्दी केली. प्रदर्शनाला भेट देऊन उद्योजकांच्या उत्पादनांचे आणि नाविन्यपूर्ण कलाविष्काराचे कौतुक नागरिकांनी केले. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कंपन्यांची उत्पादने,नवोदित उद्योजकांचे नाविन्यपूर्ण कलाविष्कार बघण्याची संधी नागरिकांना या प्रदर्शनात मिळाली.

पदार्थांपासून कृषी, पर्यटन, गृहोपयोगी वस्तूंचे आणि नाविन्यपूर्ण कलाविष्काराचे दर्शन घडविणारी उत्पादने प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरले आहे. प्रदर्शनात B2B अंतर्गत मोठ्या कंपन्या आणि उद्योजकांमध्ये विचारांची देवाणघेवाण झाली. उद्योजकांना बाजारपेठा उपलब्ध करून देऊन त्यांच्या उत्पादनांची खरेदी करण्याचे आश्वासनही मिळाले. या वेळी उद्योग क्षेत्रातील विविध तज्ज्ञांनी विविध परिसंवादाद्वारे उद्योजकांना मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसनही केले.

ज्येष्ठ विधीज्ञ अविनाश भिडे,अशोका बिल्डकॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष कटारिया, आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, कोषाध्यक्ष राजेंद्र कोठावदे, रोहयो उपजिल्हाधिकारी नितीन मुंडावरे, सीमाचे अध्यक्ष किशोर राठी, नरेडकोचे जयेशभाई ठक्कर, सहाय्यक पोलिस आयुक्त सीताराम कोल्हे, राजेंद्र वडनेरे, बाळासाहेब जाधव, रवीश मारू, अविनाश कोठावदे, सी. एस. सिंग यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक आदींनी भेटी दिल्या.

**शिस्तबद्ध नियोजन हेच यशाचे गमक - ललित गांधी**

राज्याच्या विकासाबरोबरच उद्योजक व व्यापाऱ्यांच्या प्रश्नांबाबत चेंबर सातत्याने केंद्र राज्य सरकारकडे पाठपुरावा करून मार्गी लावत आहे. वेळप्रसंगी आंदोलनाचा मार्गही





**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे आयोजित 'मायटेक्सपो-२०२३' मध्ये मुख्य प्रायोजक दीपक बिल्डरचे दीपक चंदे यांचा सत्कार करताना आमदार सीमाताई हिरे, खासदार हेमंत गोडसे, सोबत अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल कुमार लोढा कार्यकारीणी सदस्य विजय बेदमुथा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा. दुसऱ्या फोटोमध्ये महाप्रीतचे जनरल मॅनेजर तेजस शिंदे यांना स्मृतिचिन्ह देताना अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, विजय बेदमुथा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा.**

पत्करावा लागतो. उद्योजक व्यापारी आणि विशेषतः नवउद्योजकांच्या कलाविष्कारांना चालना देण्यासाठी तसेच त्यांचे मनोबल वाढविण्यास महाएक्सपो प्रदर्शन भरवते. मुंबईत २०२२ मध्ये आयोजित पहिल्या प्रदर्शनाला भरघोस प्रतिसाद मिळाल्यानंतर नाशिकात प्रदर्शन भरविण्याचा निर्णय आम्ही घेतला आणि त्याला लाभलेला उत्तम उदंड प्रतिसाद हे चेंबरच्या शिस्तबद्ध नियोजनाचे प्रतिकच म्हणावे लागेल. पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळेच हे शक्य झाले, असे अभिमानाने नमूद करावेसे वाटते, असे प्रतिपादन चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

**नवउद्योजकांचे स्वप्न साकार करणारे प्रदर्शन - संजय सोनवणे**

मुंबईनंतर नाशिकला प्रदर्शन भरविण्याची संधी मिळाली तेव्हा मोठ्या प्रमाणात दडपण आले होते. मात्र सर्वांची साथ लाभत गेली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी तसेच मान्यवरांचे अमूल्य मार्गदर्शन आम्हाला लाभले. दीपक बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे संचालक दीपक चंदे यांनी प्रायोजकत्व तसेच अनेकांनी सहप्रायोजकत्व स्वीकारल्याने पुढील मार्ग सोपा झाला. अवघ्या काही दिवसातच स्टॉलच्या बुकिंगला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. दिमाखदार उद्घाटन झाले. पर्यावरणपूरक, नाविन्यपूर्ण स्टॉल्स आणि माहितीपूर्ण व्याख्याने ही प्रदर्शनाची वैशिष्ट्ये राहिली. प्रदर्शनाला नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. उद्योजकांना बळ देणारा तसेच नवोद्योजकांचे स्वप्न साकार करणारे हे प्रदर्शन ठरलेस असे प्रदर्शनाचे चेअरमन आणि चेंबरच्या नाशिक शाखेचे अध्यक्ष संजय सोनवणे यांनी सांगितले.

## *आयोजक आणि स्टॉलधारकांचे कौतुक*

*आमदार सीमाताई हिरे यांची एक्सपो मध्ये प्रत्येक स्टॉलला भेट देऊन त्यांच्या उत्पादनांची माहिती घेऊन कौतुक केले. स्टॉलधारकांची समन्वय डेअरी पावरचे संचालक राजाराम सांगळे यांच्या स्टॉलला भेट देऊन त्यांच्या उत्पादनांची माहिती जाणून घेतली. प्रदर्शनात मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद व प्रदर्शनात सहभागी विविध स्टॉलधारक व आयोजकांचे कौतुक आमदार सीमाताई हिरे यांनी केले.*

**उद्योग जगताला मोठा बूस्ट : कांतीलाल चोपडा**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर ही राज्यातील उद्योजक आणि व्यापाऱ्यांचे हीत जोपासणारी नामांकित संघटना आहे. कोविडचा प्रभाव बऱ्याचप्रमाणात कमी झाल्याने उद्योग जगताला बूस्ट देण्याच्या उद्देशाने मोठया धाडसाने आम्ही प्रदर्शन भरविण्याचा निर्णय घेतला आणि हे प्रदर्शन सामूहिक प्रयत्नाने यशस्वीपणे पार पडले. तीन दिवसांतच लाखांहून अधिक नागरिकांनी या प्रदर्शनास हजेरी लावल्याचे महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी सांगितले.

# जाकार्ता-इंडोनेशिया येथील भारतीय दुतावासात विशेष बैठक संपन्न




आमच्या असंख्य ग्राहकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
MALPANI GROUP
MALPANI
www.wetnjoy.in
India's Largest
Wet 'n Joy
WATER PARK
SHIRDI
95276 40000
95276 50000
LONAVALA
91122 68080
91122 78080
AMUSEMENT PARK
LONAVALA
91122 68080
91122 78080
■ Theme Park ■ Water Park
■ Snow Park ■ Hotel
Imagicaa
Khopoli-Pali Road, Near Lonavala
Khalapur - 410 203
www.imagicaaworld.com
022 – 62552929
www.saiteerth.in
97678 40000
साई तीर्थ
THEME PARK
SHIRDI




**'मायटेक्स एक्स्पो', नाशिक या प्रदर्शनास काँग्रेसचे विधिमंडळ नेते आणि माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी भेट दिली यावेळी सोबत चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा आदी मान्यवर.**

# महाराष्ट्र चेंबरचे 'मायटेक्स्पो-नाशिक प्रदर्शन' प्रशंसनीय - माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात

**नाशिक** : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र चेंबरची प्रगतीच्या दिशेने सुरू असलेली घोडदौड प्रशंसनीय आहे. चेंबरने भरविलेले 'मायटेक्स एक्स्पो' प्रदर्शन अनेकांना प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार काँग्रेसचे विधिमंडळ नेते आणि माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले.

माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी प्रदर्शनस्थळी भेट देऊन प्रत्येक स्टॉलची पाहणी केली. स्टॉलधारकांशी त्यांनी संवाद साधून त्यांच्या उत्पादनाची माहिती जाणून घेतली. त्यानंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. या प्रदर्शनामुळे उद्योजकांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रारंभी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल कुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा अध्यक्ष संजय सोनवणे, समन्वयक सचिन शहा, सहसमन्वयक मिलिंद राजपूत यांनी त्यांचे स्वागत केले. माजी मंत्री डॉ. शोभा बच्छाव, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राजाराम पानगव्हाणे, ज्ञानेश्वर गायकवाड या सर्वांचा सत्कारही यावेळी करण्यात आला. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी यांनीही प्रदर्शनास भेट दिली.

**अखेरच्या दिवशी गर्दीचा उच्चांक; दीड लाखाचा टप्पा पार**

नाशिक-डोंगरे वसतिगृह मैदानावर चार दिवस महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रिकल्चरतर्फे आयोजित मायटेक्सपो- २०२३ उत्साहात पार पडले. कडाक्याचे ऊन असतांनाही प्रदर्शन पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली. प्रदर्शनात सोमवारच्या दिवशी गर्दीचा उच्चांक झाला. चार दिवसांत दीड लाखांहून अधिक नागरिकांनी प्रदर्शनाला भेट दिली.

नामांकित कंपन्यांच्या अधिकारी व त्यांच्या प्रतिनिधींनी B2B अंतर्गत सर्व स्टॉल्सना भेटी देऊन उद्योजकांच्या उत्पादनांची माहिती जाणून घेऊन त्यांच्या मालास उठाव कसा मिळेल, याबाबतचा कानमंत्र दिला. आवश्यकता भासल्यास त्यांची उत्पादने खरेदी करण्याचे दिलेले अभिवचन हे या प्रदर्शनाचे खरे फलित म्हणावे लागेल. शेवटच्या दिवशी प्रदर्शन बघण्यासाठी ७५ हजारांहून अधिक लोकांनी गर्दी केली. विशेष म्हणजे विविध शाळा आणि महाविद्यालयांचे विद्यार्थी गटागटाने आल्याचे चित्र जाणवले. पदाधिकाऱ्यांना वाटून दिलेल्या कामाचे उत्कृष्ट वाटप झाल्याने आणि प्रत्येकाने मानापमानास फाटा देऊन आपापली जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पडल्याने प्रदर्शन यशस्वी झाले, असा विश्वास महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी,वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल कुमार लोढा,उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा आणि प्रदर्शनाचे चेअरमन संजय सोनवणे यांनी व्यक्त केला. तसेच कोरोना ओसरल्यानंतर ३०० उद्योजक आणि व्यापाऱ्यांनी धाडस करून स्टॉल्स उभे केल्याने आभार व्यक्त केले.

**भाग्यवंताना मौल्यवान बक्षीसे**

प्रदर्शनास भेट देण्यास येणाऱ्यांना मिळालेल्या कूपन मधून दर तासाला लकी सोडती द्वारे अनेक भाग्यवंतांना हमखास मौल्यवान बक्षिसे मिळाली. नागरिकांच्यात प्रदर्शनाचे खास आकर्षण होते. काही जण तर १०-१० कूपन घेऊन आपले भाग्य आजमाविण्याचा प्रयत्न करताना दिसत होते. प्रदर्शन आयोजकांनी ४१ लाखांच्या बक्षिसांची घोषणा केली होती. यात इलेक्ट्रिक बाइक हे बंपर प्राईज होते. तसेच शेवटच्या दिवशी ४१ मौल्यवान बक्षीसेही मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते वितरित करण्यात आली.

**उद्योजकांत मोठा उत्साह**

मायटेक्सपो- २०२३ प्रदर्शन 'न भूतो न भविष्यती' असे यशस्वी झाले. सर्व पदाधिकाऱ्यांनी दिलेली मोलाची साथ आणि २५० चे स्टॉल्सचे उद्दिष्ट असतानाही ३०० स्टॉल्स उभारले गेल्याने उद्योजकांत मोठा उत्साह दिसून आला, असे चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा आणि शाखा अध्यक्ष संजय सोनवणे यांनी सांगितले. प्रदर्शन यशस्वीतेसाठी राजाराम सांगळे, विकास पगारे, रवी जैन, ललित नहार, मिथिला कापडणीस, नीलिमा पाटील आदींसह कार्यकारिणी सदस्यांनी परिश्रम घेतले.

**सांस्कृतिक कार्यक्रम**

उत्तर महाराष्ट्रातील महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभासदांचे सहकुटुंब स्नेह मिलन संपन्न झाले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या सर्व सदस्य बांधवांसाठी MITEX एक्स्पोच्या यशस्वी आयोजना निमित्त समारोपाच्या दिवशी सायंकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहमेळाव्याने कार्यक्रमाची सांगता झाली.



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरची ९६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेला मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर उपस्थित वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल लोढा, MEDC चे अध्यक्ष रवि बोराटकर, GMBF चे अध्यक्ष डॉ. सुनिल मांजरेकर, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, आशिष पेडणेकर.

# महाराष्ट्र चेंबरच्या ९६ वर्षांच्या इतिहासातील सर्वाधिक विक्रमी नफा १ कोटी ३२ लाख रुपये : अध्यक्ष ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबरची ९६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

मुंबई : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरची ९६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २२ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी ३ वाजता बाबासाहेब डहाणूकर सभागृह, मुंबई येथे उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी २०२३-२४ या वर्षाकरिता अध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष पदाच्या झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी श्री. ललित गांधी व वरिष्ठ उपाध्यक्षपदी श्री. अनिलकुमार लोढा यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती प्रभारी सहकार्यवाह श्री. सागर नागरे यांनी सभेला दिली.

यावेळी वार्षिक सभेचे सूचना वाचन करण्यात आले. ९५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त एकमताने मंजूर करण्यात आले. चेंबरच्या ९६ व्या वर्षाचा अहवाल वाचून एकमताने मंजूर करण्यात आला. लेखापरीक्षकानी तपासलेला २०२२-२३ या वर्षाचा ताळेबंद व जमाखर्च यातील प्रमुख मुद्दे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी सभेला सांगितले. अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी २०२२-२३ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र चेंबरच्या ९६ वर्षांच्या इतिहासातील सर्वाधिक









९६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल लोढा, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, कांतीलाल चोपडा, MEDC चे अध्यक्ष रवि बोराटकर, GMBF दुबई चे अध्यक्ष डॉ. सुनील मांजरेकर यांचा सत्कार करण्यात आला.



**९६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब तसेच नितिन बंग, नाशिक शाखा चेअरमन संजय सोनवणे, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.**

